महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
PEI पाटील इलेक्ट्रॉनिक्स इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेचा प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेस प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
▪ इलेक्ट्रिकल सुपरवायझर ▪ ऑटोमोबाईल टेक्निशियन
▪ इलेक्ट्रिकल वायरमन ▪ मोटार वायडिंग
▪ टू-व्हीलर मेकॅनिक ▪ फोर व्हीलर मेकॅनिक
▪ A.C. मेकॅनिक ▪ वेल्डर / फ्लंबर
▪ कॉम्प्युटर ऑपरेटर ▪ कॉम्प्युटर हार्डवेअर
एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)

डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल / व्हॉट्सॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ६२ वा | बुधवार, दि. २४ सप्टेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# सोलापूरात आभाळ फाटलं!

## ७२९ गावांना पुराचा फटका, २ लाख हेक्टर शेतीचं नुकसान


### सीना नदीचे पाणी सोलापूर जिल्ह्यातील 110 गावांत शिरले
### 85 लोकांना सुरक्षितस्थळी हलवले; माढ्यात आर्मीला बोलावले
### पुणे-सोलापूर महामार्गावरील लांबोटी पुलावरील एका बाजूची वाहतूक बंद
### वडकबाळ पुलालगत विजयपूर हायवेवरही पाणी


### आर्मीच्या हेलिकॉप्टरने दारफळ येथे अडकलेल्या आठ नागरिकांना एयरलिफ्टिंग द्वारे बाहेर काढण्यात आले
### शेतकऱ्यांच्या मदतीसाठी २ हजार २१५ कोटी मंजूर, नुकसानीच्या निकषांमध्ये शिथिलता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूरला मुसळधार पावसाने झोडपून काढलं. या पावसामुळे जिल्ह्यात मोठं नुकसान झालं आहे. जिकडं तिकडं पाणीच पाणी पाहायला मिळत आहे. सोलापूरातील तब्बल ७२९ गावं पाण्याखाली गेली आहे. शेतीसह घरांचे मोठे नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यात ६ जणांचा मृत्यू झाला तर ४९ जनावरं आणि १५ हजारांपेक्षा जास्त कोंबड्या दगावल्या आहेत. पूरग्रस्तांना शक्य तितकी मदत करण्यात यावी असे आदेश प्रशासनाकडून अधिकाऱ्यांना दिले आहेत. सोलापूर जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे सुमारे २ लाख हेक्टर शेतीचे नुकसान झालेत. सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या प्राथमिक अहवालनुसार १ ते २२ सप्टेंबरपर्यंत तब्बल १ लाख ९५ हजार ६३१ हेक्टर शेतीचे


















नुकसान झाले. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे २ लाख २२ हजार ८८१ शेतकरी बाधित झाले आहेत. तर जिल्ह्यातील ११ तालुक्यातील तब्बल ७२९ गावांना अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसला आहे. सप्टेंबर महिन्यात नैसर्गिक आपत्तीमुळे सोलापूर जिल्ह्यामध्ये ६ जणांचा मृत्यू झाला आहे. ४९ जनावरे, १५ हजार ४१ कोंबड्या देखील दगवल्या आहेत. जिल्ह्यात एकूण ५४१ घराची पडझड झाली तर ४०५८ जणांच्या घरात पाणी शिरलं. सोलापूर जिल्हा प्रशासनाने केलेल्या प्राथमिक अहवालतून माहिती ही धक्कादायक आकडेवारी समोर आली आहे. अंतिम आकडेवारीत नुकसान आणखी वाढण्याची शक्यता आहे.

अतिवृष्टीमुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे ॲक्शन मोडमध्ये आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आदेश दिले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील अतिवृष्टी आणि महापुराची परिस्थिती पाहता विभाग प्रमुखांना केंद्र न सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पूर स्थितीत लोकांना मदतकार्य करण्यासाठी कोणत्याही विभागाचे खाते प्रमुख आणि कर्मचारी मुख्यालय सोडू नये, असे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. धाराशिव व सोलापूर जिल्ह्यातील मुसळधार पावसामुळे सीना नदीत २ लाख क्युसेकपेक्षा जास्त पाणी वाहत असून ५० हजार क्युसेक वहनक्षमतेपेक्षा चारपट पाणी असल्याने ११० गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. आतापर्यंत १८५ नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून ९ बचाव पथके, ११ बोटी व ठऊक्क्च्या टीम्स रात्रंदिवस शोध व बचाव कार्य करत आहेत. माढा, मोहोळ, बार्शी तालुक्यात शेकडो नागरिकांची यशस्वी सुटका झाली असून दारफळ येथे अडकलेल्या नागरिकांना एअरलिफ्ट करण्यासाठी आर्मी हेलिकॉप्टर बोलावण्यात आले आहे. गेल्या दोन दिवसांपासून होत असलेल्या अतिवृष्टीमुळे तसेच सीना कोळेगावसह तीन धरणांतून तसेच भोगावती नदीतून येत असलेल्या पाण्यामुळे सीना नदीने रौद्र रुप धारण केले आहे. सीना नदीची वहनक्षमता 50 हजार क्युसेकची असताना सध्या नदीतून सुमारे दोन लाख क्युसेक पाणी वाहत आहे, त्यामुळे पाणी नदीपात्राबाहेरून वाहत आहे. सीना नदीचे पाणी काठावरील 110 गावांत शिरले असून आतापर्यंत 185 लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे.

धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यातील सीना पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या मुसळधार पावसामुळे सीना नदीला महापूर आला आहे. सीना कोळेगाव धरणातून 72 हजार, चांदणीतून 39 हजार 771, खासापुरी धरणातून 35 हजार 839 क्युसेक, तर भोगावती नदीतून 52 हजार असा एकूण 2 लाख क्युसेकचा विसर्ग सीना नदीपात्रात होत आहे. वास्तविक सीना नदीची वहनक्षमता ही पन्नास हजार क्युसेकची आहे, त्यामुळे नदीकाठच्या गावांत मोठ्या प्रमाणात शिरले आहे. पूर परिस्थितीमध्ये शोध व बचाव कार्यासाठी प्रशासनाकडून एकूण 9 टीम कार्यरत करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी सोलापूरच्या 5 टीम, कोल्हापूरच्या 2 टीम (त्यापैकी एक कार्यरत आहे एक मदत कार्यासाठी पोचत आहे) व NDRF ची देखील दोन टीमपैकी एक कार्यरत आहे व दुसरी टीम पोहोचत आहे.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी इतर जिल्ह्यांतील जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून अकरा बोटी पुरेशा मनुष्यबळासह उपलब्ध करून दिल्या आहेत. यामध्ये कोल्हापूरमधून 3, लातूरमूधन 1, सांगलीतून 3, इंदापूरमधून 2, नांदेडमधून 2 अशा 11 बोटी मागवण्यात आलेल्या आहेत. जिल्ह्यातील शोध व बचाव पथक तसेच आपदा मित्र आणि बार्शी नगरपालिका अग्निशमन विभाग यांनी 21 सप्टेंबर ते 23 सप्टेंबर या कालावधीत 185 नागरिकांची पुराच्या पाण्यातून सुटका केलेली आहे. जिल्हा आणि तालुका प्रशासन महापुराची परिस्थिती हाताळण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेत आहेत. नागरिकांनी मदतीसाठी जिल्हा नियंत्रण कक्षाच्या 0217-2731012 या क्रमांकवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### माढ्यातील बचाव कार्य

माढा तालुक्यातील म्हैसगाव येथील सरवदे वस्ती या ठिकाणच्या बाधित 18 लोकांना व एका पाळीव प्राण्याला रेस्क्यू टीमने सुरक्षित बाहेर काढले. पापनस (ता. माढा) येथील 39 लोकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. रिधोरी (ता. माढा) गावातील पुरात अडकलेल्या 8 लोकांनाही सुखरूप बाहेर काढले व इतर 28 लोकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. शिंगेवाडी (ता. माढा) येथील सीना नदीच्या पुराच्या पाण्यात अडकलेले शिंदे वस्तीवरील नऊ व्यक्तींना बोटीच्या सहाय्याने सुरक्षितपणे बाहेर काढून सुरक्षितस्थळी हलविले आहे.

### मोहोळ, बार्शीत पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका

मोहोळ तालुक्यातील आष्टे येथे सीना नदीच्या पुरामध्ये अडकलेल्या एकूण बारा नागरिकांपैकी ३ महिला व ५ लहान मुले अशा ८ जणांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे. बार्शी तालुक्यातील इलेवाडीच्या यशवंत नगर वस्तीमध्ये भोगावती नदीचे पाणी आले आहे, त्यामुळे वस्तीवरील कुटुंबाची राहण्याची व्यवस्था कुटुंबाचे नातेवाईक, बिरोबा मंदिर व जिल्हा परिषद शाळांमध्ये करण्यात आला आहे. या कुटुंबाची जेवणाची व्यवस्था ग्रामस्थांमार्फत करण्यात आली आहे

### तांदूळवाडी, देगावमध्ये बचावकार्य

तांदुळवाडी येथे सीना नदीच्या पुराच्या पाण्यात अडकलेल्या 27 नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात आले आहे. देगाव येथे पुराच्या पाण्यात अडकलेले आतकरे कुटुंबास सुखरूप बाहेर काढण्यात आले. त्यांना देगावच्या जिल्हा परिषद शाळेत स्थलांतरित करण्यात आले आहे.

### माढ्यातील दारफळमध्ये आर्मीला बोलावले

माढा तालुक्यातील दारफळ येथे पुराच्या पाण्यात अनेक नागरिक अडकले असून एनडीआरएफ टीमचे पथक बचावासाठी गेले होते. पण, पुराच्या पाण्याचा प्रवाह खूप वेगाने येत असल्याने अडकलेल्या त्या नागरिकांना सुखरूपणे बाहेर काढणे शक्य झाले नाही, त्यामुळे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्या नागरिकांना एअरलिफ्टद्वारे बाहेर काढण्यासाठी सैन्य दलाशी चर्चा केली आहे. आमीर्चे हेलिकॉप्टर पथक लवकरच दारफळ येथे पोहोचून सर्व नागरिकांना बाहेर काढण्याची कार्यवाही करतील. सीना नदीतून सुमारे दोन लाख क्युसेक वेगाने पाणी वाहत असून मोहोळ तालुक्यातील लांबोटी पुलाला हे पाणी लागले आहे, त्यामुळे प्रशासानाने दक्षतेचा उपाय म्हणून पुणे-सोलापूर महामार्गावरील लांबोटील पुलावरील एका बाजूची वाहतूक बंद करण्यात आली आहे, त्यामुळे ही दोन्ही बाजूची वाहतूक एकाच पुलावरून सुरू करण्यात आली आहे. तसेच, सोलापूर-विजयपूर मार्गावरील वडकबाळ पुलाच्या दोन्ही बाजूला रस्त्यावर पाणी साचल्याने या पुलावरील वाहतूक बंद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुणे-सोलापूर महामार्गाच्या इतिहासात प्रथमच लांबोटी पुलावरून एका बाजूची वाहतूक बंद ठेवण्याची वेळ आली आहे. पुलावर जेसीबी, तीन रुग्णवाहिका आणि होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. दरम्यान, करमाळा तालुक्यातील संगोबा येथे पुरात अडकलेल्या सहा जणांची सुटका करण्यासाठी गेलेल्या एनडीआरएफची बोट मध्येच बंद पडली आहे, त्यामुळे एनडीआरएफचे जवान आणि सहाजण मध्येच अडकून पडले आहेत. याच ठिकाणी मंदिरात अडकून पडलेल्या नागरिकांना ड्रोनद्वारे अन्न व पाणी पुरविण्यात आले आहे. सीना नदीतून तब्बल दोन क्युसेक वेगाने पाणी वाहत आहे. सोलापूर जिल्हा आणि मोहोळचे प्रशासन महापुराच्या स्थितीवर लक्ष ठेवून होते. मोहोळचे पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे हे या ठिकाणी उपस्थित असून मोहोळ पोलिस प्रशासनाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांच्या पथकाला या ठिकाणी प्राचारण केले आहे. सीना नदीचे मंगळवारी दुपारी तीनच्या सुमारास मोहोळ तालुक्यातील लांबोटी पुलाला लागले आहे.

पुलाच्या आडव्या खांबास पाणी लागल्यानंतर त्याचा दाब पयार्याने संपूर्ण पुलावर येऊन संपूर्ण पुलास मोठा धोका पोहोचू शकतो, त्यामुळे पाणी लागल्यानंतर वाहतूक बंद ठेवणे क्रमप्राप्त ठरले आहे. पोलिस प्रशासन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाने अधिकाऱ्यांचा अभिप्राय घेऊनच त्यानंतर वाहतूक बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याची माहिती आहे. सोलापूर जिल्हा प्रशासनाने दुपारी तीनच्या सुमारास दक्षतेचा उपाय म्हणून लांबोटी पुलावरील एका बाजूची वाहतूक बंद केली आहे. दोन्ही बाजूची वाहतूक आता एकाच पुलावरून होत आहे. प्रशासाने दक्षतेचा उपाय म्हणून पुलावर जेसीबी, रुग्णवाहिका आणि होमगार्ड तैनात केले आहेत. दरम्यान, सीना नदीला आलेल्या महापुरामुळे सोलापूर-विजयपूर महामार्गावरील वडकबाळ येथील पुलाच्या जवळ पाणी पोचले आहे. सीना नदीतून विसर्ग वाढला तर वडकबाळच्या पुलालाही पाणी लागू शकते. या पुलालगतच्या विजयपूर महामार्गावर दोन्ही बाजूला पाणी आले आहे, त्यामुळे या पुलावरही पाणी आल्यास वाहतूक बंद होऊ शकते.

सिना कोळेगाव धारणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस चालू असल्याने तसेच सिना निमगाव मधून



खूप मोठ्या प्रमाणात डिस्चाज सिना कोळेगाव धरणातून आज दिनांक दि :- 23/09/2025 रोजी एकूण 72000 क्युसेकने सुरू असलेला विसर्ग आज रात्री 8:15 वाजता कमी करून 69500 क्युसेक एवढा करण्यात आला आहे. सिना नदीच्या दोन्ही तिरावरील शेतकरी, नागरिक या सर्वांनी याबाबत सावधानता बाळगावी.पाण्याची आवक व पावसाचे प्रमाण लक्षात घेता नदीपात्रातील विसर्गात वाढ/कमी होण्याची शक्यता आहे.

**- कार्यकारी अभियंता**
सिना कोळेगाव प्रकल्प विभाग परंडा

२३ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ९ वाजता वीर धरणातून नीरा नदीच्या पात्रात सुरू असलेल्या विसर्गामध्ये वाढ करुन ७८३७ क्यूसेक्स इतका करण्यात येणार आहे. निरा नदीच्या दोन्ही तिरावरील सर्वांनी याबाबत सावधानता बाळगावी.पाण्याची आवक व पावसाचे प्रमाण लक्षात घेता नदीपात्रातील विसर्गात वाढ/ कमी होण्याची शक्यता आहे.

**... कार्यकारी अभियंता**
निरा उजवा कालवा विभाग फलटण.

सोलापूर रेल्वे विभागातील सीना नदीवरील दोन रेल्वे पूल ओलांड्यांमध्ये पाण्याची पातळी धोक्याच्या सीमारेषेवर पोहोचली आहे. प्राप्त व्हिडीओमध्ये पुढील रेल्वे वाहतुकीसाठी सुरक्षित अंतर अत्यंत कमी असल्याचे स्पष्ट दिसून येते. त्यामुळे गाड्यांचा वेग ३० किमी प्रतितास इतका कमी करण्यात आलेला आहे. याशिवाय मार्गातील अनेक स्थानकांपर्यंत रस्तामार्गाने पोहोचणे सध्या शक्य नाही. कृपया वरून येणाऱ्या पाण्याच्या प्रवाहाचे नियमन करता येईल का याची शक्यता तपासावी. कारण दौंड-वाडी हा मार्ग राष्ट्रीय रेल्वे नेटवर्कमधील एक अत्यंत महत्त्वाचा दुवा आहे.

**— वरिष्ठ विभागीय सुरक्षा अधिकारी,** सोलापूर विभाग, मध्य रेल्वे.

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा मंत्रिमंडळ बैठकीत आढावा घेण्यात आला. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांना माहिती दिली. आतापर्यंत ३१ लाख ६४ हजार शेतकऱ्यांना २२१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे. यापैकी १८२९ कोटी रुपये जिल्हा स्तरावर वितरित करण्यात आले असून येत्या 8 ते 10 दिवसात शेतकऱ्यांच्या बँक खात्यांत जमा होईल. तशा सूचना स्थानिक प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

### सीना नदीच्या पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर माढा तालुक्यात ठऊक्क्व लष्कर पथकांची नियुक्ती - जिल्हाधिकारी आशीर्वाद

आर्मीच्या हेलिकॉप्टरने दारफळ ता. माढा येथील पुराच्या पाण्यात अडकलेल्या नागरिकांचे बचाव कार्य सुरू, जवळपास दहा नागरिकांची सुटका झाली असून अन्य नागरिक ही लवकरच सुखरूप बाहेर काढले जातील. भारतीय हवामान खात्याने सोलापूर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला असून उत्तर सोलापूर (ग्रामीण), माढा, करमाळा, मोहोळ, बार्शी व मंद्रुप (दक्षिण सोलापूर) तालुक्यांमध्ये पूरस्थितीची शक्यता लक्षात घेता जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी तातडीने शोध व बचाव कार्यासाठी पथकांची नियुक्ती केली आहे.

विकणे /भाड्याने देणे आहे
वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरीेल बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.
संपर्क : डी. बी. शिंदे
मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३
पत्ता: अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

निरामय पॅरालिसिस सेंटर
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये
कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार

नातं आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं
समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
मोबाईल नं. 9503310568
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## संपादकीय

# भारतीयांवर घाला

अमेरिकेच्या ट्रम्प प्रशासनाने भारताचा सूड उगवण्याचे जे सत्र आरंभले आहे ते रोज एका नवीन वळणावर जाताना दिसते आहे. 50% आयात कर वाढीनंतर या सरकारने भारतीयांच्या एच वन बी व्हिसा वरील फी सहा लाखांवरून तब्बल सुमारे 90 लाख रुपयांवर नेली आहे, हा निर्णय केवळ विकृत सूड भावनेचा निर्णय आहे हे स्पष्ट दिसते आहे. अन्यथा, सहा लाखांची व्हिसा फी 90 लाखांवर नेण्याचे दुसरे कोणतेच संयुक्तिक कारण दिसत नाही. ट्रम्प प्रशासनाने घेतलेला हा निर्णय बहुतांशी भारतीयांच्या मुळावर उठणारा आहे, याचे मुख्य कारण असे की अमेरिकेत सध्या या वर्गवारीतील व्हिसावर जे परदेशी नागरिक काम करतात त्यातील सुमारे 72 टक्के नागरिक भारतातील आहेत. त्यामुळे या निर्णयाचा भारतीयांवरच विपरीत परिणाम होणार आहे हे उघड आहे.

हा निर्णय जाहीर झाल्यानंतर ज्यांची मुले किंवा नातेवाईक अमेरिकेत या व्हिसावर गेले आहेत त्यांचे अक्षरशः धाबे दणाणले. अमेरिकेत काम करणाऱ्या भारतीय नागरिकांना वर्षाला सरासरी जितका पगार मिळतो तेवढीच रक्कम व्हिसा फी म्हणून भरणे हे केवळ अशक्य आहे. ज्या कंपन्यांनी भारतीय नागरिकांना एच वन बी व्हिसावर कामावर ठेवले आहे त्यांना ही फी भरावी लागते. कुठलीही कंपनी एवढा भयंकर आर्थिक भार सोसू शकणार नाही. त्यापेक्षा सरळ सरळ भारतीय कर्मचाऱ्याला मायदेशी पाठवणे हाच मार्ग त्या कंपन्या पसंत करतील. त्यामुळे तेथे काम करणाऱ्या भारतीयांसह सगळेच जण ट्रम्प प्रशासनाच्या या माथेफिरू निर्णयाने हवालदिल झाले होते.

या अध्यादेशावर अध्यक्ष या नात्याने ट्रम्प यांनी स्वाक्षरी केल्यानंतर कंपन्यांनी भारतात सुट्टीसाठी गेलेल्या कर्मचाऱ्यांना ईमेल पाठवून एका दिवसाच्या अवधीत अमेरिकेत परत येण्याची सूचना केल्याने अनेकांची जीवघेणी धावपळ झाली. पण त्यानंतर अमेरिकन प्रशासनाने खुलासा करून सध्या बाहेर गेलेल्या भारतीय नागरिकांना अमेरिकेत परतण्यासाठी लगेचच एवढी फी भरावी लागणार नाही किंवा त्यांचा व्हिसा रद्द केला जाणार नाही असे स्पष्ट केले, पण तोपर्यंत मात्र ज्यांची धावपळ झाली त्यांचे नुकसानच झाले. आता अमेरिकन प्रशासनाने आपल्या घोषणेबाबत पुन्हा एकदा स्पष्टीकरण देताना म्हटले आहे, की व्हिसा फी मध्ये करण्यात आलेली ही वाढ, सध्या ज्यांना व्हिसा मिळालेला आहे त्यांच्यासाठी लागू नसून ज्याला एच वन बी नव्याने मंजूर केला जाईल त्यांच्यासाठी ही वाढीव फी असेल. या निर्णयामुळे सध्या या व्हिसा वर अमेरिकेत कार्यरत असलेल्या भारतीय नागरिकांनी सुस्कारा सोडला हे खरे आहे पण त्यांच्या व्हिसाची मुदत संपल्यानंतर नूतनीकरणाच्या वेळी त्यांना एवढी फी भरावी लागणार आहे किंवा कसे याविषयीसुद्धा अजून संदिग्धता आहे. नवीन एच वन बी साठी इतकी मोठी रक्कम आकारण्याचा निर्णयसुद्धा भारतीय विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी मोठे संकटच ठरणारा आहे, कारण भविष्यातील मोठ्या पगाराच्या नोकरीसाठी अमेरिकेत एमएसचे शिक्षण घेण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांना ट्रम्प सरकारच्या या नव्या धोरणामुळे नोकरी मिळण्याची कोणतीच शाश्वती उरलेली नाही. त्यामुळे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना सक्तीने मायदेशीच परतावे लागणार आहे. आपल्या मुलाला अमेरिकेत पाठवून तेथे उच्च शिक्षण देऊन नोकरी लागणे हे दिवास्वप्न अनेक भारतीय पालक पाहात असतात. त्यासाठी अक्षरशः लक्षावधी रुपयांचा खर्च त्यांना करावा लागतो. प्रसंगी पोटाला चिमटा घेऊन आणि भल्या मोठ्या रकमेचे कर्ज घेऊन भारतीय पालक आपल्या मुलाला अमेरिकेत शिक्षणासाठी पाठवतात. साधारणपणे तेथे शिक्षण पूर्ण करणाऱ्या बहुतांश मुलांना अमेरिकेत नोकरी सहज उपलब्ध होत होती आणि त्यातून त्यांची कमाईसुद्धा बऱ्यापैकी होत होती. पण आता जर त्यांच्या कमाईच्या रकमेइतकीच व्हिसा फी आकारली जाणार असेल तर भारतीय पालकांचा आपल्या मुलांवर झालेला खर्च हा जवळपास वाया गेल्यातच जमा आहे. ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाला खुद्द अमेरिकेतूनच विरोध झाला असून या निर्णयाला आता तेथील नागरिक आणि कंपन्यांनी कायदेशीर आव्हान देण्याचा निर्णय घेतला आहे अशा बातम्या आल्या आहेत. या कायदेशीर प्रक्रियेतून जे काय व्हायचे ते होईल, पण ट्रम्प यांना ही अशी सुडात्मक भावनेची कृती का करावीशी वाटली याचा अंदाज अद्याप लागलेला नाही. हा निर्णय बहुतांशी भारताच्या विरोधातला निर्णय आहे याची जाणीव त्यांना झाली नसेल असेही मानता येणार नाही. ट्रम्प प्रशासनाने अलीकडच्या काळात लागोपाठ तीन मोठे निर्णय घेत भारताला मोठे धक्के दिले आहे. त्यातला पहिला निर्णय 50% टॅरिफ वाढीचा आहे, दुसरा निर्णय चाबहार बंदराबाबतचा आहे आणि तिसरा आताचा व्हिसा फी वाढीबाबतचा आहे.

आतापर्यंत भारतीय नागरिक अशा समजात होते की, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात खूप व्यक्तिगत मैत्री आहे. पण प्रत्यक्षात ट्रम्प हे भारताचे शत्रू असल्यासारखेच वागत आहेत. ट्रम्प प्रशासनाच्या अशा निर्णयांना मोदी सरकारकडून खमका विरोध किंवा प्रतिवाद केला जात असल्याचे दिसत नाही. भारतातील मोदी सरकार ट्रम्प यांच्या बाबतीत इतक्या बचावात्मक पद्धतीने का वागते याचाही उलगडा अजून झालेला नाही. व्हिसाबाबतच्या निर्णयाचे विश्लेषण करताना काही महाभागांनी असे तारे तोडले आहेत की, हा निर्णय म्हणजे भारतासाठी एक मोठी संधीच ठरणार आहे कारण, भारताबाहेर गेलेली ही सगळी प्रज्ञा आता पुन्हा भारतात परत येणार असल्याने त्याचा भारताला विकासासाठी उपयोग करून घेता येईल.

हा भंपक स्वरूपाचा युक्तिवाद आहे. अमेरिकेइतका पगार किंवा आर्थिक लाभ या लोकांना भारतात मिळणार आहे का, या प्रश्नाचे त्यांच्याकडे उत्तर नाही. अमेरिकेकडे जाणारा प्रज्ञा ओघ थांबला आणि तो भारतातच राहिला तर त्यांच्यासाठी भारत सरकार नेमक्या काय सोयीसुविधा उपलब्ध करून देणार आहे याची कोणतीही शाश्वती नाही. त्यामुळे कारणमीमांसा काहीही केली जात असली तरी ट्रम्प प्रशासनाचा हा निर्णय भारतावर घाला घालणाराच आहे.

# सत्यशोधक समाज : सामाजिक समता, न्याय आणि मानवतेची क्रांती

२४ सप्टेंबर १८७३ रोजी, महात्मा जोतिबा फुले यांनी स्थापन केलेला सत्यशोधक समाज हा केवळ एका संस्थेच्या स्थापनेचा दिन नाही, तर तो सामाजिक समता, बंधुत्व, न्याय, आणि मानवतेच्या मूल्यांचा प्रत्यक्ष प्रसार करणारा प्रवाह आहे. २४ सप्टेंबर रोजी साजरा होणारा ह्यसत्यशोधक समाज वर्धापन दिनह्ण हा दिवस त्या संस्थेच्या सामाजिक कार्याची, विचारसरणीची आणि मानवाधिकारांच्या संरक्षणाच्या भूमिकेची आठवण करून देतो.

समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहता, सत्यशोधक समाज हा भारतीय समाजातील जातीय, धार्मिक, आर्थिक आणि लिंगभेदाच्या विरोधात सतत लढणाऱ्या संघटनांमध्ये अग्रगण्य ठरतो. त्याच्या स्थापनेपासून आजपर्यंत, या समाजाने महाराष्ट्रातील तसेच भारतातील कमजोर असलेल्या, पिछडलेल्या आणि शोषित गटांवर होणाऱ्या अन्यायावर लक्ष केंद्रीत केले आहे. सत्यशोधक समाजाने जातीय व धार्मिक भेदभावाचा निषेध केला, समाजातील असमानतेवर प्रश्न उपस्थित केला, तसेच सामाजिक न्याय, समानता आणि लोकशाही मूल्यांची जोपासना केली. या संस्थेने समाजातील प्रत्येक घटकाला सामाजिक बदलासाठी सहभागी होण्याची प्रेरणा दिली, आणि समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, समाजातील सामाजिक गतिशीलता व बंधुत्वाची भावना वाढवली.

सत्यशोधक समाजाची स्थापना त्या काळातील सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिस्थितींचा परिणाम मानता येईल. १८७३ च्या भारतात समाजातील विविध गटांमध्ये असमानता, शोषण, जातीभेद, महिला व बालकांविरुद्ध अन्याय, गरीब व कामगार वर्गांचे हक्कांचे उल्लंघन या समस्या प्रचंड पातळीवर होत्या. त्या परिस्थितीत सत्यशोधक समाजाचा जन्म हा केवळ सामाजिक चळवळीचा भाग नव्हता, तर मानवाधिकार, समानता आणि बंधुत्व या मूल्यांच्या दिशेने वाटचाल करण्याचा निर्णायक टप्पा ठरला. महात्मा फुले यांनी या संस्थेच्या माध्यमातून शोषित गटांना न्याय मिळवून देण्याचे आणि समाजातील अन्यायपूर्ण व्यवस्थांवर प्रश्न उपस्थित करण्याचे उद्दिष्ट ठेवले.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, हे आंदोलन समाजातील असमानता कमी करण्याचे, सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याचे आणि सर्वसमावेशक विकास साधण्याचे माध्यम ठरले. सत्यशोधक समाजाने लोकांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून दिली, शोषणाविरोधात आवाज उठवण्यास प्रोत्साहित केले, आणि सामाजिक बदलासाठी ठोस उपक्रम राबवले.

सत्यशोधक समाजाच्या कार्यप्रणालीमध्ये शिक्षणाला अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. शिक्षण हे केवळ विद्या प्राप्तीचे साधन नाही, तर सामाजिक समता, बोधशक्ती, आत्मनिर्भरता आणि व्यक्तिमत्व विकासाचे मुख्य आधार आहे. ग्रामीण महाराष्ट्रातील शोषित आणि पिछडलेल्या गटांसाठी सत्यशोधक समाजाने शालेय शिक्षण, बालविकास, महिला शिक्षण आणि सामाजिक साक्षरता या क्षेत्रात कार्य केले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, शिक्षणामुळे समाजातील व्यक्तींमध्ये निर्णयक्षमता, आत्मसन्मान, सामाजिक सहभाग आणि न्यायबुद्धी विकसित होते. शाळा, कार्यशाळा, चर्चासत्रे आणि सार्वजनिक व्याख्याने या माध्यमातून लोकांमध्ये ज्ञान, संवेदनशीलता आणि सामाजिक बोध निर्माण करणे हा सत्यशोधक समाजाचा ठळक उद्देश राहिला. या उपक्रमांमुळे ग्रामीण समाजातील महिला, बालके आणि वंचित वर्गाचे सामाजिक स्थान सुधारले आणि समाजातील असमानतेवर मात करण्याची दिशा स्पष्ट झाली.

महिला सक्षमीकरण हे सत्यशोधक समाजाच्या कार्यातील अत्यंत महत्त्वाचे अंग आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय दृष्टीने सक्षम करणे, ज्यामुळे लिंगभेद आणि सामाजिक असमानतेला प्रत्यक्ष उत्तर मिळते. सत्यशोधक समाजाने महिलांसाठी शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिल्या, आरोग्य व पोषणाबाबत जागरूकता निर्माण केली, स्वरोजगार व कौशल्य विकासाचे कार्यक्रम राबवले, आणि समाजातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग सुनिश्चित केला. ग्रामीण भागातील महिलांना बालविवाह, कुटुंब नियोजन, आरोग्य, पोषण आणि सामाजिक हक्कांबाबत मार्गदर्शन केले गेले. या उपक्रमांमुळे महिलांचे आत्मविश्वास वाढला, समाजातील लिंगभेद कमी झाला आणि सर्वसमावेशक सामाजिक विकास साधला गेला. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, या कार्यामुळे समाजात स्त्रियांचे सामाजिक स्थान सुधारले, महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून सामाजिक न्यायाचा प्रसार झाला आणि समाजातील सामाजिक बंधुत्व दृढ झाले.

सत्यशोधक समाजाचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे सामाजिक चेतना निर्माण करणे. समाजशास्त्राच्या दृष्टीने, सामाजिक चेतना म्हणजे व्यक्तींना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे, शोषण व अन्याय ओळखण्यास प्रवृत्त करणे, आणि सामाजिक बदलासाठी आवश्यक असलेल्या क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे.

सत्यशोधक समाजाने सार्वजनिक सभा, कार्यशाळा, माध्यमांचा उपयोग करून लोकांमध्ये जागरूकता निर्माण केली. लोकांनी जातीय, धार्मिक, आर्थिक आणि लिंगभेदांविरुद्ध आवाज उठवणे, न्यायाच्या मागणीसाठी एकत्र येणे, आणि सामाजिक सुधारणा साध्य करण्याचे महत्त्व समजून घेतले. या प्रक्रियेत समाजातील प्रत्येक घटक सक्रिय सहभागी झाला, आणि सामाजिक बदलाचे स्थायी परिणाम सुनिश्चित झाले. ग्रामीण आणि शहरी भागातील लोकशिक्षण, आरोग्य, पोषण, महिला सक्षमीकरण आणि रोजगारनिर्मिती या क्षेत्रांमध्ये सत्यशोधक समाजाच्या उपक्रमांनी सामाजिक गतिशीलता वाढवली आणि लोकशाही मूल्यांची जाणीव निर्माण केली.

सत्यशोधक समाजाचे कार्य केवळ शिक्षण आणि महिला सक्षमीकरणापुरते मर्यादित नाही, तर सामाजिक न्याय, आर्थिक समता, आरोग्य आणि पोषण यावर देखील प्रभावी परिणाम साधते. ग्रामीण भागातील गरीब, आदिवासी, दलित आणि अन्य पिछडलेल्या गटांसाठी रोजगारनिर्मितीचे कार्यक्रम, आरोग्य सुविधा, पोषण अभियान आणि बालविकासाचे उपक्रम राबविले गेले. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, या उपक्रमांमुळे समाजातील दुर्बल घटक सशक्त होण्यास मदत झाली, सामाजिक विषमता कमी झाली, आणि समाज अधिक न्यायपूर्ण व समतोल बनला. सत्यशोधक समाजाने समाजातील विविध गटांमध्ये बंधुत्व, सहकार्य आणि सहिष्णुतेची भावना रुजवली, ज्यामुळे सामाजिक संघर्ष कमी होतो आणि समानतेच्या मूल्यांचा प्रसार होतो. या उपक्रमांमुळे समाजातील प्रत्येक घटक समाजात सक्रियपणे सहभाग घेऊ लागतो आणि सामाजिक निर्णय प्रक्रियेत योगदान देतो. सत्यशोधक समाजाच्या सामाजिक कार्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे बालविकास व शिक्षण क्षेत्रातील योगदान होय. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, बालविकास हे समाजाच्या भावी पिढीच्या मानसिक, शारीरिक आणि सामाजिक स्वास्थ्याचे मूलभूत अंग आहे. सत्यशोधक समाजाने ग्रामीण भागातील बालकांसाठी शालेय शिक्षण, पोषण, आरोग्य आणि सामाजिक साक्षरतेवर विशेष लक्ष दिले. यामुळे बालकांचा सर्वांगीण विकास साधला जातो, आत्मविश्वास वाढतो आणि समाजातील शोषण व असमानतेविरुद्ध सजगता निर्माण होते. बालकांना त्यांच्या अधिकारांची जाणीव करून देणे, शालेय वातावरणातून सामाजिक मूल्यांची शिकवण देणे, आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे हे सत्यशोधक समाजाचे ठळक योगदान आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, यामुळे समाजाची सामाजिक कार्यक्षमता वाढते, पुढील पिढीसाठी समतेची संस्कृती रुजते आणि सामाजिक बदल टिकाऊ बनतो.

सत्यशोधक समाजाच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचे अंग म्हणजे आरोग्य आणि पोषण क्षेत्रातील योगदान होय. ग्रामीण भागातील गरीब, आदिवासी आणि पिछडलेल्या समुदायांसाठी आरोग्य सुविधा, पोषण कार्यक्रम, कुटुंब नियोजन आणि बालकांच्या पोषणाची काळजी या बाबींवर या संघटनेने विशेष लक्ष दिले.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, आरोग्य व पोषणामुळे समाजातील दुर्बल घटक सशक्त होतात, सामाजिक समता वाढते आणि सामाजिक विषमता कमी होते. आरोग्य आणि पोषण हे केवळ शारीरिक स्वास्थ्यापुरते मर्यादित नाही, तर ते सामाजिक न्याय व समानतेचे मूलभूत घटक बनतात. या उपक्रमांमुळे समाजात जागरूकता, सामाजिक सहभाग आणि समता साधली जाते.

सत्यशोधक समाजाच्या सामाजिक कार्याचे महत्त्व हे स्पष्टपणे दिसून येते की, या संस्थेने समाजातील दुर्बल घटकांना सशक्त केले, सामाजिक जागरूकता वाढवली, आणि न्याय, समानता व बंधुत्व यांच्या मूल्यांची जोपासना केली. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून, सत्यशोधक समाजाने समाजातील आर्थिक, लिंगीय, जातीय आणि धार्मिक विषमतांविरोधी आंदोलन राबवले, सामाजिक सुधारणा साधल्या, आणि सामाजिक चेतना निर्माण केली. या उपक्रमांमुळे ग्रामीण तसेच शहरी समाजातील लोक सामाजिक बदलात सक्रिय सहभागी होऊ लागले. सत्यशोधक समाजाच्या उपक्रमांमुळे समाजातील व्यक्तींमध्ये आत्मविश्वास, निर्णयक्षमता, बंधुत्वाची जाणीव आणि सामाजिक जबाबदारी वाढली.

२४ सप्टेंबर रोजी साजरा होणारा वर्धापन दिन हा केवळ संस्थेच्या स्थापनेचा दिवस नाही, तर तो समाजातील प्रत्येक व्यक्तीला न्याय, समानता, बंधुत्व, सामाजिक चेतना आणि लोकशाही मूल्यांच्या आचारसंहितेचे पालन करण्याची प्रेरणा देणारा दिवस आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्याने दाखवून दिले आहे की समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून केलेले सामाजिक उपक्रम फक्त तात्पुरते बदल घडवून आणत नाहीत, तर दीर्घकालीन, टिकाऊ आणि सर्वसमावेशक सामाजिक बदल साधतात. या संघटनेच्या कार्याने महाराष्ट्रात आणि भारतीय समाजात सामाजिक सुधारणा, समानता, महिला सक्षमीकरण, बालविकास, शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगारनिर्मिती आणि सामाजिक चेतना या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, सत्यशोधक समाज हा समाजातील प्रत्येक घटकासाठी मार्गदर्शक ठरतो, ज्यामुळे प्रत्येक नागरिक समाजातील बदलासाठी सहभागी होतो आणि सामाजिक न्याय व समतेच्या मूल्यांची जोपासना करतो. सत्यशोधक समाजाचा संदेश हे फक्त ऐतिहासिक दस्तऐवज नाही, तर तो सामाजिक बदल, बंधुत्व, न्याय आणि समतेचा स्थायी आदर्श आहे. या संघटनेच्या उपक्रमांनी समाजातील असमानता कमी करण्यास, सामाजिक समता वाढवण्यास, आणि प्रत्येक व्यक्तीला त्याचे अधिकार समजून घेण्यास मदत केली. या उपक्रमांमुळे समाज अधिक न्यायपूर्ण, समतोल, जागरूक आणि सहिष्णू बनला आहे. सत्यशोधक समाजाच्या कार्याने हे सिद्ध केले आहे की सामाजिक सुधारणा आणि समानतेसाठी केलेले प्रयत्न केवळ संस्था किंवा व्यक्तीपुरते मर्यादित नसून, समाजातील प्रत्येक घटकाच्या जीवनात, निर्णय प्रक्रियेत, आणि सामाजिक संबंधांमध्ये दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवू शकतात.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. क्र. ९९६०१०३५८२,
ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# थोर व्यक्तीविषयक
## भयभीता धीट । करितो महात्मा

महात्मा जोतिराव फुले यांचे समकालीन न्या. रानडे यांनी तत्कालीन महाराष्ट्र अचेतन झालेल्या थंड गोळ्यासारखा वाटतो, असं खेदाने नमूद केलं होतं आणि ते खोटं नव्हतं. शोषणकर्ते ब्राह्मण शोषण करून थंड झाले होते आणि शोषित बहुजन सर्वस्व गमावून थंड झाले होते. म्हणूनच क्रांतिबा जोतिरावांनी शोषणकर्त्यांना आसूड मारून तापवलं. बहुजनांची मनं, असत्याखाली दडपलेलं सत्य दाखवून पेटवली. क्रांतीची आग बहुजन समाजात निर्माण झाल्यावर ती कायमस्वरूपी पेटत राहावी, या उद्देशानेच महात्मा जोतिरावांनी सत्यशोधक समाजची स्थापना २४ सप्टेंबर १८७३ रोजी केली. त्यानंतर महाराष्ट्राच्या थंड गोळ्यात थोडी थोडी हालचाल, चळवळ दिसू लागली. प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, 'कष्टकरी समाजाला जाग आणण्यासाठी आणि संघटित होऊन आपल्या अधिकारप्राप्तीस्तव संघर्षशील बनवण्यासाठी जोतिरावांनी सत्यशोधक समाजची स्थापना केली. त्यांच्या या प्रयत्नाचं युगपरिवर्तनकारी स्वरूप लक्षात आल्यामुळेच जसे बहुजनांचे नेते डॉ. विश्राम घोले, रामशेट उरवणे, राजन्ना लिंगू, रामय्या अय्यावारू, लक्ष्मण शिंदे आदि सत्यशोधक समाजात सहभागी झाले; तसंच समतोल विचारवंत न्या. महादेव गोविंद रानडे, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, डॉ. भांडारकर, गोवंडे असे ब्राह्मणही महात्मा फुले यांचे समर्थक बनले!'

महात्मा फुले यांना थॉमस पेन यांच्या निबंधातून क्रांतीची प्रेरणा प्राप्त झाली, असं प्रा. रा. ग. जाधव यांनी स्पष्ट केलं आहे. म्हणजे, सत्यशोधक समाजच्या स्थापनेची मूळं पाश्चिमात्य पुरोगामी विचारधारेत शोधावी लागतील. प्रा. जाधव म्हणतात, 'जोतिरावांच्या अपूर्व क्रांतिकारकतेचं रहस्य हे थॉमस पेनप्रणीत पश्चिमी संस्कृतीच्या आकृतिबंधात शोधावं लागेल.'

भारतीय विचार परंपरेत ईश्वरेच्छा आणि भाग्यवादाशिवाय काही नसल्याने सत्यशोधकाला नवविचारांच्या, विज्ञाननिष्ठेच्या, बुद्धिप्रामाण्यवादाच्या, स्वातंत्र्य-समता-बंधुतेच्या मदतीने भारतीय जनमानस निर्मळ करण्यासाठी, जोतिरावांनी जी विचारधारा प्रवाहित केली, तिचंच नाव होतं- सत्यशोधक समाज, धर्म आणि संस्कृतीच्या सोज्वळ नावाखाली ब्राह्मणवर्ग समाजाचं जे आर्थिक शोषण करीत होता आणि कर्मकांडांची मायावी सृष्टी उभी करून जो सामाजिक अत्याचार करत होता, हे सारं कर्म अत्यंत हिडीस आणि पराकोटीचं घृणास्पद होतं. म्हणून जोतिरावांनी ब्राह्मणी कपटातील असत्य शोधण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन केला. प्रा. गं. बा. सरदार म्हणतात, 'धार्मिक व सामाजिक गुलामगिरी समूळ नष्ट करणं, हे सत्यशोधक समाजाचं मुख्य उद्दिष्ट होतं.'

'लोकजीवन ग्रासणारे राहू-केतू असे जे शेटजी व भटजी होते त्यांच्यावरच जोतिराव तुटून पडत होते.' असं चरित्रकार कृ. गो. सूर्यवंशी म्हणतात आणि महात्मा फुलेंच्या काळी भटजीच शेठजीचं काम करीत, असा इतिहास आहे.

सत्यशोधक समाजापुढे ब्राह्मणेतर समाजाच्या उद्धाराचं फार मोठं आव्हान उभं ठाकलं होतं. म्हणूनच सत्यशोधक समाजने धार्मिक, मानसिक, सामाजिक आणि आर्थिक विकासाची उद्दिष्टं समोर ठेवून कार्यास प्रारंभ केला. भाई बागल म्हणतात, 'सत्यशोधक झाल्याखेरीज देवाधर्माच्या, अंधश्रद्धेच्या, रूढीच्या, परंपरेच्या आणि भट-पुरोहिताच्या पकडीतून आपली सुटका होणार नाही, हे बहुजन समाजाला कळलं.' सामाजिक क्रांतीच्या उद्रेकाला आवश्यक असा सात्त्विक संताप निर्माण करण्याचं फार मोठं काम महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजतर्फे केलं. सत्यशोधक समाज तेहतीस कोटी देव मानत नाही. महात्मा फुले यांनी लोकांपुढे 'निर्मिका'ची कल्पना ठेवली. त्याला पूजा, अर्चा नको, मंदिर नको, कर्मकांड, व्रत-वैकल्यं नकोत, असं सांगितलं. सत्यशोधक समाजाने लोकांना- प्रामाणिकपणे कष्ट करणारा सुखी होतो, असं म्हटलं. सर्व धर्मग्रंथ माणसांनी लिहिले आहेत, म्हणून ते अपूर्ण आहेत. पाप-पुण्य, स्वर्ग-नरक या कल्पना खोट्या आहेत. स्त्री-पुरुष समानच मानावेत. पुराणं व स्मृतिग्रंथ लबाडीने व खोटारडेपणाने भरली आहेत, म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. वेद हे माणसांनी लिहिले, आपली कामं हाच आपला धर्म असं मानावं, सदाचरण प्रत्येकाने कसोशीने करावं, धर्माची चिकित्सा तकर्नि-विचाराने करावी. दैव, भाग्य या खोट्या कल्पना ज्योतिषी लबाडांनी पसरवल्या म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. व्यसनमुक्ती व अज्ञानमुक्ती हे प्रत्येकाचं कर्तव्य आहे. श्राद्धादी कृत्यं ही पोटभरू भट-ब्राह्मणांनी लोकांना सांगितली. माणसाला पुनर्जन्म नाही, असा अत्यंत वास्तववादी उपदेश सत्यशोधक समाजने समस्त समाजाला करून भटीथोतांडातून समाजमन मुक्त केलं.

महात्मा फुले यांनी लोकोद्धारासाठी आपली संपूर्ण आर्थिक, सामाजिक आणि शारीरिक शक्ती खर्च करून जो कामाचा डोंगर उभा केला, तो केवळ आश्चर्य करण्याइतका प्रचंड आहे. मृत्यूसमयी हा महात्मा म्हणाला, 'बंधूंनो, आपण खूप कार्य केलं. दोन हजार वर्षांत आपणाला जे मिळालं नाही, ते येत्या पन्नास वर्षांत खात्रीने मिळेल. पण आता पेशवाईत गुरासारखे वागत होता तसं न वागता वाघासारखे वागा!'

क्रांतिबा जोतिरावांच्या सत्यशोधकी कार्याला प्रणाम करताना या विचार-कार्याचे लाभार्थी कसे व्यवहार करतात; ह्याची तपासणी होणं आवश्यक आहे. कारण-

महात्मा जोतिबा । क्रांतिवीर होते ।<br>
उद्धारक होते । शोषितांचे ॥१<br>
दया, क्षमा, शांती । यांचे मूर्तरूप ।<br>
बदली विद्रूप । समाजाला ॥२<br>
लबाड धर्माचा । प्रतिबंध केला ।<br>
शोषणाला आळा । घालावया ॥ ३<br>
सत्यशोधकांची । केली उभी फौज ।<br>
उतराया माज । ऐतोबांचा ॥४<br>
समता, स्वातंत्र्य । बंधुताप्रसार ।<br>
ब्रीद जन्मभर सांभाळले ॥५<br>
नव्या युगा जन्म । दिला जोतिबांनी ।<br>
करावया जन्मभूमी । भटमुक्त ॥ ६<br>
भयभीता धीट । करितो महात्मा ।<br>
संजीवक धर्मा । जन्मा घाली ॥७<br>
क्रांतिबा जोतिबा । तुम्ही विश्वरत्न ।<br>
पायी हे नमन । नम्रभावे ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# AI फोटो ट्रेंड मजेशीर पण धोकादायकही...!

कालपरवा एका मित्राने सहज एक फोटो चांगला आला म्हणून फेसबुकवर टाकला. दोन ते तीन तासाने त्या फोटो खाली तोच फोटो पण शेजारी चिटकवून एक सुंदर मुलगी हातात हात घालून जसे हे खरोखरच नवराबायको आहेत असा कुणीतरी टाकला. त्याला कळायच्या अगोदरच घरी बातमी व फोटो पोहोच झाला होता. नशीब बलवत्तर मित्राचे लग्न झाले नव्हते पण संध्याकाळी घरी होणार होतं तेच झाले. हे कशामुळे झाले तर AI मुळे. आधुनिक तंत्रज्ञानात एआय (Artificial Intelligence) ही सर्वात वेगाने वाढणारी क्रांती आहे. फोटो तयार करणे, बदलणे आणि नव्या पद्धतीने दाखवणे हे त्याचे मोठे आकर्षण बनले आहे. विशेषतः महिलांसाठी फोटो-जनरेशन एआय हे एक धोकादायक शस्त्र ठरू शकते. दिसायला हा एक साधा ट्रेंड असला, तरी त्याचे सामाजिक, मानसिक आणि नैतिक परिणाम गंभीर असू शकतात. आज फक्त एक साधा फोटो अपलोड केला तरी कृत्रिम बुद्धिमत्ता त्यातून डझनभर नवीन, वेगळे फोटो तयार करून देते. पारंपरिक मेकअपशिवाय सुंदर दिसणे, नवीन ड्रेस घातल्यासारखे फोटोज, किंवा आगळीवेगळी लोकेशन्स हे सर्व एआयमुळे शक्य होते. अनेक महिला व मुली यामध्ये मजा म्हणून सहभागी होतात. परंतु या मागे लपलेला धोका कुणालाही सहज लक्षात येत नाही.

काल नवरात्रीला सुरूवात झाली पहिला दिवस हा पांढरा रंग देवीच्या साडीचा. जिकडे पहावे तिकडे महिला, मुली पांढऱ्या कपड्यात दिसायच्या आणि मनसोक्त फोटो सेशन चालू. बरं हे फक्त मंदिरात नाही तर ऑफिस, कॉलेज, महिला मंडळ, गावागावात एकत्र येऊन फोटो काढले. निवांत बसले असे नाही. सोशल मीडियावर नुसता धुमाकुळ. असे आता नऊ दिवस चालणार. पण नवरात्रीतले नऊ रंग धार्मिक नाहीत, हा तर मार्केटिंगचा फंडा आहे. आज इंटरनेटचा व एआयचा वापर करून काहीही करता येते. त्यामुळे नाहक मानहानी आणि त्रास होत असतो. आपल्या मनात काहीच नसते. फोटो चांगला आला म्हणून सोशल मीडियावर टाकतो पण पुढचा त्याचा वापर कसा करेल हे सांगता येत नाही. या एआय मुळे पुरुष व महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त होऊ शकतात. नवरात्रीतील रंगापेक्षा तुमच्या कर्तृत्वाचे रंग यापेक्षा जास्त देखणे आहेत हे नक्की! मजा म्हणून, एन्जॉय म्हणून ठिक आहे हो. फक्त त्याची परंपरा, संस्कृतीत परिवर्तन होऊ नये म्हणजे मिळवलं.

आज चक्रीवादळांचा अंदाज घेण्यासाठी अल्गोरिदम डिझाइन करण्यापासून ते व्हाईट हाऊस कौन्सिलला सल्ला देण्यापर्यंत, महिलांची एक नवीन फौज कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पुरुषप्रधान जगात धुमाकूळ घालत आहे. काही लोकं याकडे व्यवसाय म्हणून पाहतात तर काही मजा, एन्जॉय म्हणून. खरेतर हे चांगले कि वाईट याचा विचार करण्यापेक्षा आपल्यावर काय परिणाम होईल याचा विचार करावा. सोशल मीडियावर टाकलेला साधा प्रोफाइल फोटो जर एआयच्या डेटाबेसमध्ये गेला तर, त्याचे रूपांतर कुठल्याही स्वरूपात अगदी अश्लील सुद्धा केले जाऊ शकतात. महिलांचे खोटे फोटो तयार करून त्यांचा वैयक्तिक अपमान करणे किंवा ब्लॅकमेलिंगसाठी वापरण्याचा धोका जास्त आहे. अनेकदा असे फेक फोटो इतके खरे वाटतात की त्यातला फरक साध्या व्यक्तीला लक्षात येणं कठीण होतं. अगदी हेच नाही तर कधी विचार केला आहे का की शॉपिंग ॲप्स आणि वेबसाइट्स तुमचे मन कसे वाचतात आणि तुम्हाला कोणती उत्पादने हवी आहेत हे अचूकपणे कसे सांगू शकतात? ऑनलाइन खरेदी महिलांकडून जास्त केली जाते. आपण जे सर्च करतो ते तर दाखवले जातेच पण इतरही जाहिरात किंवा वस्तू दाखवल्या जातात आणि त्यात महिला गुंतून जातात. खरेतर ऑनलाइन शॉपिंगमध्ये महिलांचे वाढते स्वारस्य फक्त 'काहीतरी विकत घेणे' यापुरते मर्यादित नाही. त्यांना ऑनलाइन खरेदी करायला आवडते ती मुख्यतः दोन कारणांमुळे, तेथे मिळणारी स्वतःची डिजिटल स्पेस आणि निवडीचे स्वातंत्र्य. त्यामुळे आपोआपच त्यांची माहिती इंटरनेटच्या माध्यमातून साठवून ठेवली जाते.

मुळात एआय हे लहान बाळाप्रमाणे आहे. जेवढी तुम्ही माहिती द्याल, तसतसा तो प्रगल्भ होत जातो. एखादा फोटो एडिट करण्यासाठी एखाद्या एआय टुल ला फोटो देतो. तिथुनच सुरुवात होते. एआय फोटो ट्रेंड मजेशीर वाटतो, पण त्याचा भविष्यातील गैरवापर गंभीर स्वरूप धारण करू शकतो. विशेषतः महिलांसाठी तो सायबर-छळाचा नवा मार्ग ठरू शकतो. म्हणून प्रत्येकाने जाणीवपूर्वक आणि सावधगिरीने या ट्रेंडमध्ये सहभाग घ्यावा. आज नुसती मजा वाटणारी गोष्ट उद्या मोठी सामाजिक समस्या बनू शकते.

**प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
९२२६१४४८३६ अकलूज.
(शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन)

## वात्रटिका

### जळते त्यालाच कळते

धो धो पडला पाऊस<br>
नुकसान पाहवत नाही...<br>
टाहो फोडून आक्रोश केला<br>
मदतीला कोणी धावत नाही...<br>
हातभर नुकसानीची<br>
वीतभर भरपाई मिळते...<br>
ज्याचे दुःख त्यालाच माहित<br>
जळते त्यालाच कळते...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# विधात्या तु तरी एवढा कठोर नकोस होऊ....

जगाच्या पाठीवर शेतकरी असा एकमेव आसामी आहे जो सदैव असमानी आणि सुलतानी' संकटांना तोंड देत सह्याद्री सारखा अखंड उभा असतो.

मागील १५ दिवसापासून संपूर्ण महाराष्ट्रात अतिमुसळधार पावसाने खरीप पिकांचे व फळबागेचे झालेले नुकसान हे नुकसान न भरून येणारे आहे यामुळे महाराष्ट्रातील शेतकर्याची अवस्था 'आगीतुन फुफाट्यात' गेल्यासारखी झाली आहे, कारण चालू घडीला उडीद,सोयाबीन कांदा, द्राक्षे, भाजीपाला पिके असो किंवा शेतात जे पीक उभे आहे ते असो अतिवृष्टीमुळे झालेल्या पावसाने पिकासोबत शेतातील माती देखील वाहून गेली आहे आणि शेतकऱ्याच्या लाखो हेक्टर जमिनीवरचे करोडो रुपयांचे नुकसान झाले आहे

दिवसरात्र राब राब राबुन हाताशी आलेलं पिके वादळी पावसाचा जोरदार तडाखा बसून सोयाबीन कांदा, ऊस ,द्राक्षे, भाजीपाला या पिकाचे होत्याचे नव्हते झाले आणि सोलापूर सह संपूर्ण महाराष्ट्रात मधील शेतकरी पुन्हा एकदा संकटात सापडला आहे, माझी माननीय मुख्यमंत्री आणि कृषीमंत्र्यांना एकच कळकळीची विनंती की तुम्ही लवकरात लवकर या पावसामुळे जे नुकसान झाले आहे त्याचे पंचनामे करून सढळ हाताने मदत करावी आणि संपूर्ण महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहिर करावा. कारण चालू स्थितीला सोयाबीन साठी एकरी ३४०० रुपये अशी तोकडी मदत जाहिर केली आहे पण १ एकर क्षेत्रावर सोयाबीन पेरणी करायचा खर्च पहिला तर पेरणीसाठी ३० किलो सोयाबीन पिशवी 3000 रुपये,पेरणी खर्च २०००रु, खते ३०००रु,कोळपणी, खुरपणी ५०००रु आणि फवारणी ५०००रु,असा एकरी २०हजार रु.पेक्षा जास्त उत्पादन खर्च होतो आणि आता मिळणारे उत्पन्न हे काहीच नाही कारण अतिवृष्टीने शेतकऱ्यांच्या सर्व पिकांचे १००टक्के नुकसान झाले आहे.

आणि हे एकरी 3400 रुपये पेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे अशी मदत सरकारने अजिबात न करता सरसकट हेक्टरी कमीत कमी ५०००० रुपये आणि बायागत क्षेत्रासाठी कमीत कमी एक लाख रुपए मदत जाहिर करून कोणतेही अटी किंवा नियम न लावता मदत जाहिर करावी आणि विमा कंपन्यांना आदेश देऊन सर्व प्रकारच्या अडचणीचे निकष वगळून मागच्या वर्षी जसा पीकविमा कंपनीने निकष ठेवला होता तसाच निकष ठेवून सर्व शेतकरी बांधवांना पंचनामा करून शेतकऱ्यांनी भरलेला पीकविमा देखील जमा करण्यात यावा ही सोलापूर जिल्हयातील बार्शी मधील एक पूरग्रस्त शेतकरी म्हणून आपणास विनंती करत आहे.

हेक्टरी ८५०० रुपये तोकडी मदत करून मायबाप शेतकरी बांधवांची थट्टा केली जात आहे आणि त्यांच्या तोंडाला पाने पुसली जात आहे अस दिसून येत आहे

जेव्हा निसर्ग कोपला जातो तेव्हा तुम्ही मदतीच्या आणाभाका करुन शेतकर्याच्या तोंडाला केवळ पाने पुसता अशाने आमचा शेतकरी कष्टकरी बाप जगेल तरी कसा ?

शेतक-यांना नुकसानभरपाई देण्यासाठी प्रशासनाकडे पैसैच शिल्लक नाहीत किंवा मदत दिली तर सरकारी तिजोरीवर भार येईल अशी



कारणीमीमांसा करु नका कारण 'न केलेल्या कामाच्या जाहिरीतीसाठी' कोटयावधी रूपयांची उधळपटी करणाऱ्या शासन-प्रशासनाकडे शेतकऱ्यांना मदतीपोटी देण्यासाठीच पैसै शिल्लक असु शकत नाही हा विरोधाभास म्हणावा लागेल, अगोदरच निसर्गाच्या लहरीपणामुळे दिवसेंदिवस अधोगतीकडे वाटचाल करत असलेल्या शेतकऱ्याला कोण तारणार? अवकाळी पावसाने केलेल्या नुकसानीची नुकसाभरपाई वेळेत मिळाली तरच त्याचा उपयोग होतो, कर्जबाजारी होऊन आत्म्याहत्या केल्यानंतर नंतर सांत्वन करून लाखो रुपये मदतीचे चेक द्यायच्या ऐवजी शेतकरी जिवंत असताना त्याला भरीव हाताने मदत करा कारण राजा हा उपभोगशुन्य स्वामी असातो हे कौटिल्याच्या वचनाचा विचार करून राजकिय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींनी लक्षात ठेवुन फक्त स्वहित जपण्यापेक्षा समाजहित आणि शेतकरीहित जपावे कारण सगळे निर्दयी बनले असताना सरकारनं शासकीय मदत द्यावी. कारण हा लोकांचाच पैसा आहे लोकांसाठीच 'नीट'वापर करावा तेवढेच तुमचे उपकार होतील जनतेवर.म्हणुनच लवकरात लवकर नुकसानभरपाई शेतकर्याच्या खात्यात जमा करावी आणि कांद्याला अनुदान पण जाहीर करावे. गारपीठ, अवकाळी पाऊस इ. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देऊन तसेच शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामग्री वापरण्यास प्रोत्साहन देण्यास प्रवृत्त करुन पिकांच्या नुकसानाच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य कसे अबाधित राखता येईल आणि कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखण्यासाठी पीकविमा योजनेत सहभागस कसे प्राधान्यक्रम देता येईल याच्याकडे पण लक्ष दिले तर बरे होईल.

पण हे सरकार अन्याय करायला कमी पड्ल होत की काय म्हणुन निसर्गसुद्धा धावून आला शेतकरयांच वाटोळे करायला, मंत्रालयातील एसी मध्ये बसून शेतकयार्चे झालेले नुकसान किती आहे यासाठी जी निकषांची बिंदुवली ठरवतात त्या राजकारणी लोकांनी आत्मचिंतन करायला हवे आणि स्वतः आत्मचिंतन करून कोणतेच अटी व जाचक बंधने न घालता मदत लवकरात लवकर जमा करावी. शेतकऱ्यांच्या वतीने मी देवाला प्रार्थना करतो की अरे हे सरकार तर आमचा विचार करत नाही, कमीत कमी विधात्या तु तरी इतका कठोर नकोस होऊ!

**दत्तात्रय पोपट पाचकवडे -पाटील**
चिखर्डे, तालुका बार्शी
जिल्हा सोलापूर

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# बक्षीहीप्परगे ग्रामपंचायतीच्या नुतन सरपंच पदी भाऊराजे देविदास जाधव यांची निवड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बक्षीहीप्परगे ता दक्षीण सोलापुर येथील ग्रामपंचायतीच्या नुतन सरपंच पदी सवार्नुमते भाऊराजे जाधव यांची निवड करन्यात आली भाऊराजे यांनी गेली चार वर्ष सामाजिक धार्मीक क्षेत्रेता खूप चांगले काम केले याच बरोबर पॅनल मधे ठरले प्रमाणे सर्व सदस्यांनी यांना संधी दिली. याबद्दल भाऊराजे यांनी सर्वांचे आभार मानले मिळालेल्या संधीचे नक्कीच सोंन करु अस सत्काराला उत्तर देताना सरपंच जाधव यांनी मत मांडले. यावेळी माजी सरपंच मनोज महाडीक, विश्रांत गायकवाड, सिताराम राठोड, नागनाथ जाधव, तसेच ग्रामपंचायत सदस्य सुरेखा कोळेकर शिवाजी राठोड, तसेच शिवाजी निकम, महेश माने, राम जाधव, राहुल जाधव, सुहास गायकवाड, नाना जाधव, बाबासाहेब माने (उदयोजक), गणेश निकम, रामप्रभु निकम, विनोद महाडीक, गणेश शिंदे, अमोल जाधव, याबरोबरच सर्व गावकरी उपस्थीत होते सर्वांनी नुतन सरपंच भाऊराजे जाधव यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या सरपंच निवडी प्रसंगी नूतन सरपंचांना शुभेच्छा देताना प्रा.संजय जाधव, सोसायटीचे चेअरमन लक्ष्मण केत, दयानंद महाविदयालयाचे माजी प्रा.मारुतीराव मस्के, दोड्डीचे मुख्याध्यापक गंगाधर डोके, सामाजिक कार्यकर्ते रामचंद्र नीकम, तंटामुक्त अध्यक्ष नाना जाधव, ईत्यादी उपस्थीत होते तसैच सर्व गावकरी ग्रामसेवक निवडनुक निर्णय अधीकारी उपस्थीत होत.

# फारूक शाब्दी यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेला सडेतोड निवेदन





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** AIMIM सोलापूर व मुंबई अध्यक्ष फारुक शाब्दि साहेब यांच्या नेतृत्वाखाली पक्षाच्या वृत्तीने शहरातील कचरा, ड्रेनेज, नालेसफाईचा प्रश्न तसेच सार्वजनिक शौचालयाचा आणि नागरिकांचे आरोग्य हा विषय गंभीर आहे, यावर तात्काळ उपाययोजना करणेबाबत महानगरपालिका आयुक्त साहेब यांना निवेदन देण्यात आले.

दरवर्षी पावसाळा जवळ आला की सोलापूर महानगरपालिका प्रशासनाला वेध लागतात ते नालेसफाईचे शहरात सात ते आठ मुख्य नाले असून त्यांना जोडणारे सब नाले देखील आहेत, नाले साफसफाई च्या नावाखाली कोट्यावधी रुपये खर्च केले जाते , प्रत्यक्षात नाले साफसफाई म्हणावी तशी होत नाही मोठा पाऊस झाला की नाले तुंबतात आणि नागरिकांच्या घराघरात पाणी शिरतं परिणामी नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होते विशेष म्हणजे मुख्य नाल्यांना पावसाळ्यात पूरच येतो यापूर्वी नाल्यात वाहून जाऊन अनेकांना आपले जीव गमवावे लागलेले आहे यापुढील काळात अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी योग्य उपाययोजना करण्यात याव.नाल्यांमध्ये मोठमोठे झाडीझुडपी झालेली आहे ती तात्काळ काढण्यात यावी, पाऊसाचे पाणी घरात पाणी शिरल्याने संसार उपयोगी सर्व वस्तूंचे नासधूस झालेली आहे, कपडे अन्न धान्य वाहून गेलेले आहे. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभागांतर्गत पुनर्वसन विभागाकडून आर्थिक मदत दिली जाते त्यासाठी जिल्हा प्रशासनाने पंचनाम्याचा अहवाल महत्त्वाचा असतो.त्यामुळे प्रशासनातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संपूर्ण शहरात पाहणी करून सर्व नुकसान झालेल्या नागरिकांचे पंचनामे करत आहेत प्रत्यक्षात अनेक पंचनामे राहिलेले आहेत ते लवकरात लवकर करून जास्तीत जास्त आर्थिक मदत देण्यात यावी. पावसाच्या पाण्यामुळे घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे नागरिकांचे धोका निर्माण झालेला आहे तरी शहरात कचरा, ड्रेनेज, नालेसफाईचा प्रश्न तसेच सार्वजनिक शौचालयाचा विषय गंभीर आहे, यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात यावा शहरांच्या मुख्य नाल्यांमध्ये झाडी झुडपे मोठी झाल्याने नाल्यातील कचरा तुडुंब भरून वाहत आहे. सर्व झाडे झुडपांची तोडणी करून नाल्याची साफसफाई करून पाण्याचा मार्ग मोकळा करण्यात यावा यासाठी निवेदन देण्यात आले.यावेळी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मगबुल मोहळकर व सहकाऱ्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश; काँग्रेसला मोठा फटका



**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या विकासात्मक दृष्टीकोन आणि एकात्मतेवर आधारित राष्ट्रवादीची वाटचलीवर आकर्षित होऊन सोलापूर शहरातील काँग्रेस पक्षाचे माजी सभागृह नेते हाजी मकबूल मोहळकर माजी नगरसेवक सिद्धेश्वर आळंदकर काँग्रेसचे माजी परिवहन सभापती सलिम पामा काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्यांक युवक अध्यक्ष नजीब शेख न्यायालयीन कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष भारत साबळे मगबुल मोहळकर यांचे चिरंजीव ॲड. ताजुदीन मोहळकर याच्यासह अनेक मान्यवरांनी आज मुंबई येथील महाराष्ट्र महीला विकास मंडळ सभागृहात राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनील तटकरे साहेब याच्या प्रमुख उपस्थितीत पक्ष प्रवेश केला याप्रसंगी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ साहेब सहकार मंत्री बाळासाहेब पाटील साहेब क्रीडा मंत्री माणिकराव कोकाटे आमदार शिवाजीराव गर्जे आमदार ईद्रीसभाई नाईकवाडी प्रदेश सरचिटणीस लतीफभाई तांबोळी जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान जेष्ठ नेते चंद्रकांत दायमा यांची उपस्थितीत होत.

यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी सर्व पक्ष प्रवेश केलेल्या मान्यवरांचे पक्षात मनपूर्वक स्वागत करीत त्यांना शुभेच्छा दिल्या माझे सहकारी सोलापूर शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांच्या सोबत आपण पक्षकार्य करीत अजितदादाचे हात बळकट करीत कराल तसेच येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूकीत राष्ट्रवादीची ताकद वाढवण्याकरीता आपले योगदान महत्त्वपूर्ण ठरेल अशी आशा व्यक्त केली.

याप्रसंगी सोलापूर शहर जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले ज्येष्ठ नेते अनिल उकरंडे सेवादल अध्यक्ष प्रकाश जाधव शहर मध्य अध्यक्ष अलमेहराज आबादीराजे युवक प्रदेश सचिव विशाल बंगाळे अल्ताफ बागवान मुशिर आळंदकर सिद्दिकी मुजावर सलीम शेख गौस नदाफ रफिक मुल्ला महबूब शेख वसीम सय्यद अबूबकर सय्यद मुज्जू नदाफ सोहेल सेख गौस मालकु अरबाज शेख रब्बानी शेख सोहेल शेख दुर्वेश ॲड इस्माईल नालवार विनोद जाधव नाना गोवर्धन सुरज कांबळे नितीन ढवण आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त उपस्थित होत.

# सीना नदीकाठच्या गावकऱ्यांनी सतर्क राहावे - खासदार प्रणिती शिंदे यांचे आवाहन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** दक्षिण सोलापूरमधील राजूर, बिरनाळ व होणमुर्गी गावांना भेट देऊन खा. प्रणिती शिंदे यांचे आश्वासन, पूरग्रस्त स्थलांतरित नागरिकांसाठी अन्न-पाणी, आरोग्य सेवा आणि जनावरांसाठी चारा तातडीने उपलब्ध करून देणार.

सोलापूर जिल्ह्यात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे भीमा, सीना नदी, तलाव आणि ओढे तुडुंब भरून वाहत असून अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. ग्रामीण भागातील शेती, पिके व पशुधन यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पाणी शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांना तात्पुरते स्थलांतर करावे लागले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील राजूर, बिरनाळ आणि होणमुर्गी या गावांना खा. प्रणिती शिंदे यांनी भेट देऊन पूरग्रस्तांची प्रत्यक्ष पाहणी केली व ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी नागरिकांना आश्वासन दिले की, स्थलांतरित नागरिकांसाठी अन्न-पाण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा तसेच जनावरांसाठी चाऱ्याची सोय तातडीने करण्यात येईल.

खा. प्रणिती शिंदे म्हणाल्या की, सणासुदीच्या काळात आलेल्या या अस्मानी संकटामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे आणि जनतेचे मोठे नुकसान झाले आहे. सीना नदीचे इतके भयानक व रौद्ररूप प्रथमच पाहायला मिळत आहे. अशा परिस्थितीत सर्वांनी सुरक्षिततेस प्राधान्य द्यावे व आवश्यक ती खबरदारी घ्यावी. तसेच त्यांनी आवाहन केले की, 'या कठीण काळात नागरिकांनी धीर सोडू नये. आपणच एकमेकांचा आधार आहोत. आपल्या मदतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. यावेळी सुभाष देवकते, कांतु पुजारी, सरपंच सतीश देवकते, तुकाराम माळेवाडी, महेश मळेवाडी, पोलीस पाटील, बिराप्पा बिराजदार, राहुल देवकते, बिराप्पा सोनटकले, सिद्धाराम देवकते, उपसरपंच श्रीकांत स्वामी, चिदानंद बागले, निसार आत्तार, सिद्धाराम पुजारी, शिवानंद सालुटगी सुभाष तेली, राजू कोळी, रजाक निंबाळे, दावलजी मुल्ला, कलंदर कादरी, मुबारक लिंबाळे, दिलीप शेख, अमोगसिद्ध वाघमारे, बसवराज हसापुरे, सैफन नगारे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शक्ती देवीच्या जयजयकारात प्राणप्रतिष्ठा उत्सव जल्लोषात पार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी यांच्या शारदीय नवरात्र महोत्सवास सोमवारी मोठ्या जल्लोष मय वातावरणात आई राजा उदे उदे सदानंदीचा उदे उदेचा गजर करीत भक्ती आणि शक्ती देवीचा जागर करीत शहरातील विविध मंडळांनी शक्ती देवीची प्राणप्रतिष्ठापना मिरवणूक काढून देवीची प्रतिष्ठापना केली. दरम्यान ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या उत्सव मूर्तीची प्रतिष्ठापना मिरवणूक मंडळाचे संस्थापक आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव यांच्या नेतृत्वाखाली सोमवारी सोलापूर रेल्वे स्टेशन समोरील महात्मा गांधी पुतळ्यापासून प्रारंभ करण्यात आला या मिरवणुकीचे शुभारंभ सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघाचे आमदार देवेंद्र कोठे, सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, भाजपा शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, काँग्रेस शहराध्यक्ष चेतन नरोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल,शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, भाजपाचे ज्येष्ठ नेते विक्रम देशमुख, राष्ट्रवादीचे नेते आनंद चंदनशिवे, उद्योजक सिद्धेश्वर मुनाळे, शिवसेना शहराध्यक्ष सचिन चव्हाण, मनोज शेजवाल, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते हेमंत चौधरी, आनंद मुस्तारे, अश्विनी हॉस्पिटलचे डॉ. सुजित जागीरदार, गंगामाई हॉस्पिटलचे डॉ. एस प्रभाकर, ऑक्सीजन चेस्ट क्लिनिकचे डॉ. फिरोज सय्यद, डायबेटिक केअर सेंटरचे डॉ. भास्कर पाटील, सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिंदे साहेब, शिवाजी गायकवाड, अंबादास गायकवाड जाधव, ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचे मार्गदर्शक अनिल जाधव, राजू याराना, चंद्रकांत ब्रदर जाधव, राष्ट्रवादी युवती अध्यक्ष किरण माशाळकर, राष्ट्रवादी महिला शहराध्यक्ष संगीता जोगदनकर, इरफान शेख, माजी नगरसेवक श्रीनिवास कोंडी,रुक्मिणी जाधव, बिराजदार मावशी, संगीता गायकवाड, कैकाडी समाज अध्यक्ष मदन गायकवाड, प्रमिला स्वामी, यांच्यासह विविध राजकीय सामाजिक वैद्यकीय शैक्षणिक अशा अन्य क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत शक्ती देवी प्राणप्रतिष्ठापना मिरवणुकीचे विधिवत पूजन होऊन मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. ढोल, ताशा, संभळ आणि हलग्यांच्या कडकडाटात फटाक्यांची आतषबाजी करत हजारो युवकांनी यावेळी शक्ती देवी प्राणप्रतिष्ठापना मिरवणुकी दरम्यान बहारदार लेझीमचा खेळ सादर केला. याप्रसंगी आमदार देवेंद्र कोठे यांनी देखील ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सवाच्या लेझीम पथकामध्ये सहभागी होऊन लेझीमचा खेळ सादर केला. यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचे मार्गदर्शक किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड आणि उत्सव अध्यक्ष चेतन नागेश गायकवाड यांनी केले. नवरात्र उत्सव हा सण वाईटांवर चांगल्यांच्या विजयाचे प्रतीक आहे पौराणिक कथेनुसार देवीचे महिषासुर राक्षसाचा वध करून नकारात्मक शक्तीचा नाश केला त्यामुळे हा उत्सव दैवी स्त्रीत्वाचा आदर सन्मान करण्यासाठी साजरा करण्यात येतो असे मनोगत यावेळी आमदार देवेंद्र कोठे यांनी व्यक्त केले तसेच शारदीय नवरात्र महोत्सवाच्या निमित्ताने तमाम शहरवासी यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना पालिका आयुक्त डॉ.सचिन ओंबासे म्हणाले की शारदीय नवरात्र महोत्सवात सर्व मंडळांनी शासनाच्या नियमांचे पालन करीत नवरात्रोत्सव अत्यंत शांततेने व उत्साही वातावरणाने साजरा करावे असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना मंडळाचे मार्गदर्शक किसन जाधव म्हणाले की यंदाच्या वर्षी सोलापूर शहरांमध्ये डीजे मुक्त मिरवणुका काढण्यात येत आहेत प्रशासनाच्या आव्हानाला प्रतिसाद देत आम्ही देखील डीजे डॉल्बीला फाटा देत पारंपारिक वाद्याला प्राधान्य देऊन महाराष्ट्राची संस्कृती जपली आहे शक्ती देवीचा जागर मोठ्या उत्साही वातावरणात मंडळाच्या वतीनं नऊ दिवसात करण्यात येतो यंदाच्या वर्षी देखील कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह असल्याचे ते म्हणाले. यावेळी हजारो कार्यकर्त्यांनी बहारदार लेझीमचा अत्यंत शिस्तबद्ध बहारदार लेझीमचा खेळ सादर केला. ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाच्या शक्ती देवीची मिरवणूक सोलापूर रेल्वे स्टेशन येथून प्रारंभ होऊन कुमार चौक, मोदी पोलीस चौकी, मोदी रेल्वे ब्रिज, इराणा वस्ती, रामवाडी दवाखाना, पटवर्धन चाळ, एसलबी रिक्षा स्टॉप, काका बिअर शॉप, मरगु मास्तर मैदान सेटलमेंट ग्राउंड, या मार्गावरून निघून ईच्छा भगवंताची चौक येथे प्रतिष्ठापना मिरवणुकीचे विसर्जन करण्यात आले यावेळी धार्मिक विधिवत पूजा होऊन आदिमायेचा जागर करीत शक्ती देवीची प्राणप्रतिष्ठापना उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी ईच्छा भगवंताची नवरात्र महोत्सव मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच देवी भक्तांची मोठी उपस्थिती होती.

# करजगी तलाव वगळता सर्व तलाव तुडुंब '; लघू पाटबंधारे विभागांतर्गत आहेत १० साठवण तर ९५ पाझर तलाव



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** गेल्या दहा ते बारा दिवसांपासून अक्कलकोट शहर व तालुक्यात पावसाने जोरदार बॅटिंग केल्याने तालुक्यातील नदी, नाले, ओढे व तलाव भरून वाहत आहेत. तसेच बोरी मध्यम प्रकल्प म्हणजे कुरनूर धरण सुद्धा गेल्या महिनाभरापासून तुडुंब भरून जादा पाणी खाली सोडण्यात येत आहे. अक्कलकोट तालुक्यातील एखादा अपवाद सोडला तर सर्व तलाव, पाझर तलाव तुडुंब भरले आहेत.

अक्कलकोट तालुक्यात लघू पाटबंधारे विभागांतर्गत १० तलाव येतात. त्यामधील नऊ तलाव तुडुंब भरून वाहू लागले तर करजगी येथील एक तलाव कोरडा आहे. यापैकी एकही तलाव फुटलेला नाही. बोरगाव दे. तलावाजवळील सांडव्याखाली पाणी जाण्याचा मार्ग पूर्ण तुटलेला आहे. त्यामुळे तलावाकडे जाता येत नाही. तसेच घोळसगाव साठवण तलावाच्या सांडव्याखालील गाइडबंड खचून वाहून गेलेला आहे.

मृदा व जलसंधारण विभागांतर्गत एक ल. पा. तलाव, साठवण तलाव १०, पाझर तलाव ९५ आहेत. तालुक्यात पडलेल्या दमदार पावसामुळे हे सर्व पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. तसेच अक्कलकोट शहरातील बायपास मार्गावरील राम तलाव व हत्ती तलाव हे दोन मोठे तलाव असून, पावसामुळे हे दोन्ही तलाव तुडुंब भरलेले आहेत. हत्ती तलावाला दोन सांडवे असल्याने पाण्याने तुडुंब भरल्यानंतर जादा झालेले पाणी सांडव्यातून वाहून पुढे जाते. परंतु, राम तलावाला मात्र सांडवा नसल्याने थडगे मळ्यातील डोंगराला टेकून हा तलाव तुडुंब भरला आहे. हा तलाव केव्हाही फुटण्याच्या मार्गावर असल्या कारणाने त्याला रविवारी एका बाजूने सांडव्यासारखी वाट करून खालील बाजूस पाणी सोडण्यात आलेले आहे, त्यामुळे हा तलाव फुटण्याचा धोका टळला आहे. वाढलेले बहुतांश पाणी खाली जात असताना ते थडगे मळा येथील परिसरात पसरल्याने त्या ठिकाणी दलदल निर्माण झाली आहे.

तालुक्यातील तलावांची स्थिती

१) भुरीकवठे १०० टक्के, २) बोरगाव १०० टक्के, ३) हंजगी १०० टक्के, ४) डोंबरजवळगे १०० टक्के, ५) काझीकणबस १०० टक्के, ६)शिरवळवाडी १०० टक्के, ७) सातनदुधनी १०० टक्के, ८) गळोरगी १०० टक्के, ९) घोळसगाव १०० टक्के, १०) करजगी तलाव : कोरडा आहे.

# शिवप्रसाद फाउंडेशन व सेवासदन मल्टीस्पेशालिटी च्या वतीने मोफत महाआरोग्य शिबिर



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** शिवप्रसाद फाउंडेशन व सेवासदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मिरज यांच्या संयुक्त विद्यमाने रणजीत आण्णा सूळ कॉम्प्लेक्स, पुण्यश्लोक अहिल्यादेवी चौक धर्मपुरी (बंगला), ता.माळशिरस या ठिकाणी

मोफत आरोग्य शिबिर व चष्मे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद (बापु) मोरे तसेच मा.जि.प. सदस्या ऋतुजाताई शरद मोरे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महालक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमांची सुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमामध्ये मोफत हृदयरोग तपासणी (ईसीजी, अँजिओग्राफी, अँजिओप्लास्टी) यूरोलॉजी तपासणी (लघवीचे आजार, किडनी, मूत्राशयाचे आजार, प्रोस्टेट), डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप (तिरळेपणा, बुबुळ, प्रत्यारोपण, पापणी पडलेले-रेटीना) कॅन्सर तपासणी,

रक्त तपासणी, मेंदूचे आजार तपासणी व शस्त्रक्रिया मनका व मज्जातंतू यासंबंधी मोफत शस्त्रक्रिया मोतीबिंदू शस्त्रक्रिया इत्यादी वरील सर्व आजारांच्या मोफत तपासण्याचा लाभ परिसरातील ५०० नागरिकांनी घेतला. त्या ठिकाणी मोठया प्रमाणात चष्मे वाटप करण्यात आले.सेवासदन मल्टी स्पेशलिस्ट यांच्यातर्फे लता मोरे यांनी कामकाज पाहिले तसेच ऑपरेशनची तपासणी केली.यावेळी

शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद (बापु) मोरे मा. जि.प. सदस्या ऋतुजाताई शरद मोरे,अण्णा सूळ, भाजपा सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष बाजीराव काटकर, किशोर सूळ, शुभम सूळ, भारत सूळ, तुषार पाटील, वैभव मोरे, सुशांत पाटील, अमर रणवरे, तेजस मोरे, कार्यकर्ते, अधिकारी, पदाधिकारी, नागरिक, सेवासदन हॉस्पिटलचे डॉक्टर व कर्मचारी, शिवप्रसाद फॉउंडेशनचे पदाधिकारी व कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निर्मल
व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय

**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-

8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी

प्रोप्रा. हरी सुभाष विरपे

9822964815
9421984815

झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## ग्रामपंचायत महादेववाडी ता.माढा जि.सोलापूर

**टेंडर नोटीस**

ग्रामपंचायत महादेववाडी,ता.माढा,यांचेकडून खालील कामे करण्यासाठी नोंदणीकृत मक्तेदाराकडून बंद लखोट्यात निविदा मागविण्यात येत आहेत. १५ वा वित्त आयोग, ग्रामपंचायत स्तर

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | |
|---|---|---|---|
| १) | सौरपंप | १,२९,७४६/- | २०२२-२३ |
| २) | पाण्याची टाकी दुरुस्त करणे. | ९९,८९२/- | २०२३-२४ |
| ३) | वैयक्तिक शोषखड्डे | २९,९५८/- | २०२३-२४ |
| ४) | भूमीगत गटार दुरुस्ती | ४९,१६८/- | २०२३-२४ |
| ५) | पिण्याच्या पाण्याच्या टाकीजवळ परिसर स्वच्छ करणे व सांडपाणी व्यवस्थापन करणे. | ५३,८६७/- | २०२३-२४ |
| ६) | स्मशानभूमी महादेवमंदिर बाळूमामा मंदिर येथे पाण्याची सोय करणे. | ५३,९७१/- | २०२३-२४ |
| ७) | ग्रामपंचायत समोर पेव्हिंग ब्लॉक बसविणे. | ७१,८९१/- | २०२३-२४ |
| ८) | भूमीगत गटार दुरुस्ती करणे. | ४९,७७०/- | २०२४-२५ |
| ९) | वैयक्तिक शोषखड्डे | ३९,८१३/- | २०२४-२५ |
| १०) | नवीन बोअरवेल विथ कॉलम पाईप | ८९,९८६/- | २०२४-२५ |

टीप: १) कोऱ्या निविदा मिळणेचा कालावधी दि.२४/०९/२०२५ स.१०.०० पासून २) भरलेल्या निविदा स्वीकारण्याचा दि.२५/०९/२०२५ सायं ५.०० वा पर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय महादेववाडी ३) निविदा उघडणेचा दि.३०/०९/२०२५ रोजी स.१०.०० वाजता ४) निविदे संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्रमांक १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळेल. ५) निविदा मंजूर,नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा निविदा रद्द करण्याचा अधिकार मा.सरपंच यांना राखुन ठेवला आहे.निविदा फॉर्म सुट्टीचे दिवस वगळून मिळतील व स्वीकारले जातील.

सही/- ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत
महादेववाडी,ता.माढा,जि.सोलापूर

शिक्का

सही/- सरपंच
ग्रामपंचायत महादेववाडी,
ता.माढा,जि.सोलापूर

# जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत एमआयटी विश्वशांती गुरुकुलची उल्लेखनीय कामगिरी



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर येथे नुकत्याच पार पडलेल्या जिल्हास्तरीय डी.एस.ओ जलतरण स्पर्धा २०२५-२६ मध्ये वाखरी, पंढरपूर येथील एमआयटी विश्वशांती गुरुकुल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व कामगिरी करत यश संपादन केले आहे. विविध वयोगटात झालेल्या जलतरण स्पर्धांमध्ये संस्कृती कटारिया हिने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात १०० मीटर फ्री स्टाईल, १०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक आणि २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक जलतरण स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात १०० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर बटरफ्लाय, २०० मीटर वैयक्तिक मेडल व रिले स्पर्धेत ओम पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला. दुसरीकडे ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये विहान पाटील याने प्रथम तर विश्वराज भुसारे द्वितीय आला. याशिवाय १०० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये विश्वराज भुसारे प्रथम आणि विश्वजित साळुंखे याने द्वितीय

क्रमांक मिळवून यश संपादन केले. वरद नगिमे याने ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले. यानंतर झालेल्या १४ वर्षाखालील मुलांच्या ४ १०० फ्री स्टाईल (रिले) जलतरण स्पर्धेत शाळेच्या विश्वजित साळुंखे, विहान पाटील, ओम पाटील आणि पार्थ अभंग यांच्या रिले संघाने प्रथम क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांनी अभूतपूर्व अशी कामगिरी करत विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्रता मिळवत शाळेचा झेंडा उंचावला आहे.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी गवळी म्हणाले 'आमच्या विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द व घेतलेले परिश्रम हीच त्यांच्या यशाची गुरुकिल्ली आहे आणि विभागीय स्पर्धेतही आमचे विद्यार्थी नक्कीच यशस्वी होतील याची आम्हाला खात्री आहे.' यावेळी त्यांनी जलतरण प्रशिक्षक साहिल राणा यांच्या मार्गदर्शन व प्रशिक्षणाचा विशेष उल्लेख केला. यावेळी संस्थेच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आणि आगामी स्पर्धांसाठी त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

# सीना नदीच्या पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर माढा तालुक्यात NDRF व लष्कर पथकांची नियुक्ती - जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** अहिल्यानगर व धाराशिव जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे सीना कोळेगाव, चांदणी, खासापुरी प्रकल्प तसेच भोगावती नदीमधून सीना नदीमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. परिणामी सीना नदीकाठावरील गावांमध्ये पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून पुराचा धोका निर्माण झाला आहे. भारतीय हवामान खात्याने सोलापूर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केला असून उत्तर सोलापूर (ग्रामीण), माढा, करमाळा, मोहोळ, बार्शी व मंद्रुप (दक्षिण सोलापूर) तालुक्यांमध्ये पूरस्थितीची शक्यता लक्षात घेता जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण अध्यक्ष कुमार आशीर्वाद यांनी तातडीने शोध व बचाव कायार्साठी पथकांची नियुक्ती केली आहे.

नियुक्त पथकांची माहिती पुढीलप्रमाणे : – NDRF पथक – माढा तालुका : सुलतानपूर व राहूलनगर गावे

– लष्कर पथक – माढा तालुका : दारफळ गाव

सदर पथकांनी संबंधित गावांमध्ये शोध व बचाव कायार्साठी समन्वय साधून काम करावे, तसेच तहसीलदारांकडून पूरस्थितीची अद्ययावत माहिती घेऊन आवश्यक उपाययोजना कराव्यात. पुढील ठिकाणांची नियुक्ती जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार वेळोवेळी करण्यात येईल.

सोलापूर जिल्ह्यात शोध आणि बचाव कायार्साठी सैन्याची आवश्यकता आहे. म्हणूनच, याच पार्श्वभूमीवर, भारतीय सैन्याची ०१ (एक) टीम शोध आणि बचाव कार्यात मदत करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यात पाठवावी, अशी विनंती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी आर्मीच्या दक्षिण महाराष्ट्र आणि गोवा विभागाचे जनरल ऑफिसर कमांडिंग (जीओसी) मुख्यालय यांना केली होती, त्यानुसार भारतीय सैन्याचे पथक येत आहे. त्याचप्रमाणे एन डी आर एफ चे दोन पथक माढा तालुक्यात बजावाचे कार्य करत असून आणखी एक पथक जिल्हाधिकारी यांच्या प्रयत्नातून मिळणार आहे. तरी जिल्ह्यात NDRF चे तीन पदके शोध व बचावाच्या कार्यात भाग घेतील.

# पार्क स्टेडियम क्रिकेटला देण्यास विरोध नाही



**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** इंदिरा गांधी पार्क स्टेडियम महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला देण्यास आमचा विरोध नाही. परंतु अन्य खेळाची मैदाने संबंधित जिल्हा संघटनेला द्या, अशी मागणी सोलापूर शहर व जिल्हा क्रीडा फेडरेशनने पालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्याकडे केली आहे.

याचे निवेदन मंगळवारी फेडरेशनचे पदाधिकारी आणि सर्व जिल्हा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने फेडरेशनचे अध्यक्ष महेश गादेकर यांनी दिले. यावेळी फेडरेशनचे उपाध्यक्ष झुबीन अमेरिया, राजीव देसाई, प्रिया पवार, सचिव प्रा. डॉ. किरण चौगुले, सहसचिव सुदेश मालप, चंद्रकांत रेम्बर्सो, अनिल पाटील, खजिनदार प्रा. डॉ. आनंद चव्हाण, सदस्य शफी शेख, झेड. एम. पुणेकर, संतोष खेंडे, दशरथ गुरव, मरगू जाधव, अजितकुमार संगवे, सत्येन जाधव, सुरेश खुर्द भोसले, पार्वतया श्रीराम, सुदेश देशमुख, प्रा.शरणबसवेश्वर वांगी, सुनील चव्हाण, उमाकांत गायकवाड, मोहन रजपूत, राजाराम शितोळे, संतोष कदम, पुंडलिक कलखांबकर, शिवशंकर राठोड व सुवर्णा कांबळे आदी उपस्थित होते.

**क्रिकेट संघटनेशीकरार करा : आयुक्त**

हे स्टेडियम व परिसर महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनला 29 वर्षाच्या करारावर देण्यात आले आहे आणि त्याचे हस्तांतरणही झाले आहे. क्रिकेट संघटना याची सर्व देखभाल करणार आहे. त्यामुळे क्रिकेट संघटनेकडून तुम्ही ही मैदाने घ्या, असे उत्तर डॉ. ओंबासे यांनी यावेळी पदाधिकाऱ्यांना दिले. यावर झालेल्या चर्चेनंतर कोण कोणत्या खेळाची मैदाने तुम्ही घेणार आहात, त्याची देखभाल कोण करणार, आणि त्याचा मोबदला किती देणार हे दोन दिवसात आम्हाला लेखी द्या. त्यानुसार क्रिकेट संघटना व फेडरेशन यांच्यात एक बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

**महापालिकेनेच आमच्याशी करार करावा, अन्यथा आंदोलन व कायदेशीर लढा : फेडरेशन**

आयुक्तांच्या उत्तरावर फेडरेशनने तीव्र विरोध दर्शवला असून क्रिकेट संघटनेशी आम्ही करार करणार नाही, महापालिकेने आमच्याशी करार करावा. पार्क स्टेडियमवर खोखो, कबड्डी, हॉलीबॉल ही मैदाने तसेच टेबल टेनिस, जिम्नॅशियम हॉल व जलतरण तलावही स्मार्ट सिटीच्या निधीतून विकसित करण्यात आला आहे. तसेच तेथे तलवारबाजी, कराटे व शरीर सौष्ठव या खेळाडूंचाही सराव चालतो. त्यामुळे संबंधित संघटनेच्या संमतीशिवाय हा करार झालेला आहे. त्यामुळे ज्या खेळांच्या संघटना पालिकेची करार करण्यास तयार असतील त्या संघटनेची महापालिकेने करार करावा, अशी आग्रही मागणी यावेळी फेडरेशनच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केली. महापालिकेने हा करार न केल्यास आंदोलन व कायदेशीर मार्गाने लढा उभारणार असल्याचे फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी सांगितले.

# सरकारला ६ ठोस मागण्या

## पूरग्रस्तांसाठी माकपचा आवाज बुलंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सध्या महाराष्ट्रात सुरू असलेल्या मुसळधार पावसाने व पुरामुळे ग्रामीण भागात अक्षरशः हाहाकार माजला आहे. गावोगावे पाण्याखाली गेल्याने शेतमालाचे मोठे नुकसान झाले असून जनावरे सैरावैरा धावत सुटली आहेत. शेतकऱ्यांची पिके वाहून जाऊन होत्याचे नव्हते झाले आहे. मात्र प्रशासन केवळ कागदोपत्री पंचनामे करून थातुरमातुर उपाययोजना करत असल्याचा आरोप करत, प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामा करून तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) व अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने करण्यात आली.

राज्य सरकारकडे लेखी निवेदन सादर करताना 'पूरस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी तत्काळ प्रशासकीय उपाययोजना करण्यात याव्यात; अन्यथा मंत्रीमंडळाला स्वस्थ बसू देणार नाही,' असा ठाम इशारा माकपचे जिल्हा सचिव कॉ. युसुफ शेख मेजर यांनी दिला.


यावेळी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर, वडकबाळ, कवठे परिसरात माकप व अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने पूरग्रस्त शेतकऱ्यांची भेट घेऊन पाहणी दौरा करण्यात आला. या शिष्टमंडळात कॉ. युसुफ शेख मेजर यांच्या नेतृत्वाखाली माकपचे विल्यम ससाणे, ॲड. अनिल वासम, दत्ता चव्हाण, दीपक निकंबे, सुलेमान शेख, जावेद औटी, वसीम मुल्ला, अप्पाशा चांगले आदींचा सहभाग होता.

**निवेदनातील प्रमुख मागण्या**

1. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिके पाण्याखाली गेल्याने सर्वांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी.
2. दक्षिण सोलापूर तालुक्यातील ३८ गावांमध्ये पिकांचे प्रचंड नुकसान झाल्यामुळे संपूर्ण सोलापूर जिल्हा ओला दुष्काळग्रस्त घोषित करावा.
3. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रति हेक्टर एक लाख रुपये मदत द्यावी.
4. उसाचे थकित बिले देण्यास टाळाटाळ करणाऱ्या कारखानदारांवर कडक कारवाई करून एफ.आर.पी.प्रमाणे रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी.
5. ज्या कुटुंबांच्या घरात पूरपाणी शिरले आहे, त्यांना प्रति सदस्य १० हजार रुपये त्वरित मदत द्यावी.
6. जनावरांसह स्थलांतर केलेल्या शेतकऱ्यांना प्रति जनावर ५० हजार रुपये अनुदान द्यावे.

# उजनीतून पाणी सोडूनही ८६ तलाव अंशतः भरले

## उजनी कालव्यातून तलाव भरून घेणे आवश्यक



**माढा (कटूसत्य वृत्त):-** उजनी धरणातून तीनवेळा भीमा नदीत पाणी सोडूनही माढा तालुक्यातील पाझर तलाव ६० ते ७० टक्केच्या आसपास भरले आहेत. दरवर्षी सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून तालुक्यातील अनेक पाझर तलाव भरले जातात. परंतु, यावर्षी संपूर्ण क्षमतेने न भरल्याने उन्हाळ्यामध्ये शेतकऱ्यांसमोर अडचणी उभ्या राहू शकतात.

माढा तालुक्यामध्ये सुमारे १५३ पाझर तलाव आहेत. यंदा तालुक्यात चांगला पाऊस झाला आहे. आतापर्यंत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाला आहे. मात्र, तालुक्यातील अनेक पाझर तलाव हे पूर्ण क्षमतेने भरलेले नाहीत. माढा तालुक्यातील १५३ पाझर तलावांपैकी ८६ पाझर तलाव हे अंशतः भरलेले आहेत. माढा तालुक्यामध्ये सरासरी ५५० मिलिमीटर पाऊस पडतो. यंदा पावसाने सरासरी ओलांडली आहे. मात्र, पाझर तलाव पूर्ण क्षमतेने भरले नाहीत. सध्या पाऊस चालू असल्याने शेतकऱ्यांना शेती पिकांना पाणी देण्याची गरज नाही. परंतु, उन्हाळ्यामध्ये तलावांतील पाण्यामुळे विंधन विहिरी, विहिरींची पाणीपातळी वाढून शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे. त्यामुळे सीना- माढा उपसा सिंचन योजना, उजनी धरणाच्या कालव्यातून पाझर तलाव भरून घेण्याची आवश्यकता शेतकरी वगार्तून व्यक्त होत आहे.

सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून सर्व पाझर तलाव भरून घेण्याचे काम सध्या सुरू आहे. सीना-माढा उपसा सिंचन योजनेतून दरवर्षी भरले जाणारे तलाव यंदाही पूर्ण क्षमतेने भरून घेतले जाणार आहेत. त्याशिवाय सीना- माढा उपसा सिंचन योजनेचे पाणी बंद होणार नसल्याचे आ. अभिजित पाटील यांनी सांगितले.

# जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी अन्य जिल्ह्यातून शोध व बचाव कार्यासाठी मनुष्यबळासह 11 बोटी मागविल्या

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून सातत्याने पाऊस व अतिवृष्टी होत आहे. तसेच उजनी धरणातून भीमा नदीत तसेच सीना कोळेगाव प्रकल्पातून सीना नदीत मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सोडला जात असल्याने माढा, करमाळा, मोहोळ, पंढरपूर, उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर या तालुक्यातील अनेक गावे पुराच्या पाण्यात अडकलेली आहेत.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने या सर्व नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. परंतु अतिरिक्त बचाव पथके आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काल रात्रीपासून अन्य जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून अकरा बोटी पुरेशा मनुष्यबळासह उपलब्ध करून घेतल्या असून त्या आज दुपारपर्यंत घटनास्थळी दाखल होऊन बचाव कायार्ला अधिक गती मिळणार आहे. यामध्ये कोल्हापुर 3, लातूर 1, सांगली 3, इंदापूर 2, नांदेड 2 अशा 11 बोटी मागवण्यात आलेल्या आहेत.

त्याप्रमाणेच माढा तालुक्यातील दारफळ येथे पुराच्या पाण्यात अनेक नागरिक अडकले असून एनडीआरएफ टीमचे पथक बचावासाठी गेले होते परंतु पुराच्या पाण्याचा प्रवाह खूप गतीने येत असल्याने त्यांना त्या नागरिकांना सुखरूप ठिकाणी बाहेर काढणे शक्य झालेले नव्हते त्यामुळे सैन्य दलाची चर्चा करून जिल्हा प्रशासनाने त्या नागरिकांना एअरलिफ्टद्वारे सुखरूप ठिकाणी बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले आहेत. लवकरच आमीर्चे हेलिकॉप्टर पथक दारफळ येथे पोहोचून सर्व नागरिकांना बाहेर काढण्याची कार्यवाही करतील.



# अकलूज नगरपरिषद,अकलूज

ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)

फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२

Gmail-comcakluj21@gmail.com स्थापना दिनांक ०३-०८-२०२१

जा.क्रं./१२२६/अनप/२०२५ दिनांक :-२३/०९/२०२५

**अकलूज नगरपरिषद, , अकलूज**

**निविदा सूचना सन २०२५-२०२६**

अकलूज नगरपरिषदे मार्फत अंतर्गत खालील कामाकरिता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहर बंद निविदा दि. २४/०९/२०२५ ते ०१/१०/२०२५ दु.५:०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद यांचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. २४/०९/२०२५ ते ०१/१०/२०२५पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | बयाना रक्कम | कामाचे वर्णन | निविदा फॉर्म किमंत | कामाचा कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील अंतर्गत रस्ते मुरूमी करण करणे. | २,५९,६९८/- | ३०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०२ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील माळेवाडी येथील अंतर्गत रस्ते मुरूमी करण करणे. | ४,९९,४२२/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०३ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील अकलूज येथील अंतर्गत रस्ते मुरूमी करण करणे. | ४,९९,४२२/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०४ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील शिवशंकर बाजार जवळील रस्ता कॉंक्रिट करणे. | १,८६,२००/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०५ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील विजयसिंह मोहिते पाटील क्रिडा संकुल येथील पत्रे दुरुस्ती करणे. | १,१८,९८३/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०६ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील पाण्याच्या टाकी जवळील व्यापारी संकुल दुरुस्ती करणे. | ६९,७०५/- | १०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०७ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील पाटीलवाडा जवळील गटार बंदिस्त करणे. | १,३८,०९५/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०८ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील (रामायण चौक) मराईमंदिरच्या पाठीमागील बाजूस कॉंक्रिट गटार करणे. | १,२९,५४६/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ०९ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील (खाटिक गल्ली) सोमनाथ सरगर कॉंक्रिट रस्ता करणे. | ९०,०५६/- | १०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| १० | अकलूज नगरपरिषद हद्दीतील (खाटिक गल्ली) सोमनाथ सरगर कॉंक्रिट रस्ता करणे. | १,१०,६०८/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| ११ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील मदरसा समोर बंदिस्त गटार करणे. | १,१०,९९७/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| १२ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील सुजयनगर राउतनगर, पंचवटी, महादेवनगर येथील अंतर्गत रस्ते मुरूमी करण करणे. | ४,९९,४२२/- | ५०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| १३ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील विकासनगर येथील शौचालयास सेप्टिक टाकी बांधणे. | १,१९,२१७/- | २०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| १४ | अकलूज नगरपरिषद कार्यालयातील शौचालय दुरुस्ती करणे. | २,८०,०००/- | ३०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |
| १५ | अकलूज नगरपरिषद हद्दीतील विजयसिंह क्रीडा संकुल येथील बास्केट बॉल ग्राऊंडला कलर करणे. | २,३४,६३७/- | ३०००/- | निविदा फॉर्म प्रमाणे | ५००/- | १०० दिवस |

वरीलप्रमाणे कामा करिता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २४/०९/२०२५ ते ०१/१०/२०२५ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाना रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषेदेने राखुन ठेवला आहे.

**सही/-**
**(दयानंद गोरे)**
**मुख्याधिकारी**
**अकलूज नगरपरिषद,अकलूज**